
त! आणि



म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. ७२७८
१९४१

REFBK-0006199
REFBK-0006199

# तो आणिक ती

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ७३.४५४ दि. ...
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथालय
समृद्ध योजना
१९७०
REFBK-0006199

लेखक :
शंकर गोविंद साठे
बी.ए., एलएल.बी.

विक्रेते :
नवीन किताबखाना
चौक, पुणें २ : : गिरगांव, मुंबई ४

आवृत्ति पहिली : ऑक्टोबर १९४१

किंमत एक रुपया

भाषान्तर–रूपान्तर–पुनर्मुद्रणादि सर्व प्रकारचे हक्क लेखकाधीन

प्रकाशक :

श्री. वि. दामले, बी. कॉम्.

एन्. के. पब्लिशिंग हाऊस : पुणें शहर

मुद्रक :

गो. शं. बोरकर

वागळे प्रोसेस स्टुडियो ॲण्ड प्रेस लि., मुंबई १

# प्रास्ताविक

मध्यमवर्गीय सुशिक्षित तरुणतरुणींची सध्यां जी चोहोबाजूंनी कुचंबणा होत आहे तिचें धावतें चित्र रेखाटण्याचा प्रयत्न मी पुढील ओळींत केला आहे. शिक्षणावस्थेंत मनांत उभारलेल्या सुखस्वप्नाचें, 'जगांत येउनि गेलों वाया' अशा कडवट टोचणींत कसें रूपांतर होतें एवढें दाखविण्यापुरतेच प्रसंग व व्यक्ती मी निवडल्या आहेत. 'तो' आणि 'ती' यांनी पत्करलेले व्यवसाय अगर त्या दोघांचें लग्न हीं गौण महत्त्वाचीं आहेत. कौटुंबिक जबाबदारी अंगावर पडल्यावर, मूळची आर्थिक अनिश्चितता अधिकच जाणवूं लागते व म्हणून कथानकाच्या सोयीसाठीं तो आणि ती यांना संसार मांडून दिला आहे, एवढेंच.

पुढील ओळींत कदाचित् कथानकाचा ओघ आढळणार नाहीं; कांहीं निष्कर्ष काढलेलाहि सांपडणार नाहीं; पण, एकादें बांधकाम डोळ्यादेखत हळूंहळूं कोसळत चालल्याचा भास वाचकांना झाला तरी, असलें काव्याचा रंग चढविलेलें गद्य लिहिल्याबद्दल मला फारसा विषाद वाटणार नाहीं.

राजकवि 'यशवंत' यांनी 'तो आणिक ती' मध्यें 'अंतरपाट' धरून पौरोहित्य केलें याबद्दल मी त्यांचा मनःपूर्वक आभारी आहे.

८९२, सदाशिव पेठ, पुणें २
१८-१०-१९४१

शं. गो. साठे

याच लेखकाचें

छापील संसार (नाटक) — १२ आणे

आगामी

बोलका ढलपा (नाटक)

★

कंगोरे (कादंबरी)

★ ★ ★

न वी न कि ता ब खा ना

पुणें २ :: मुंबई ४

वा. क्र. ६९८६
(स्थळ प्रत)

# अन्तरपाट

It was an important gain that writers should become more socially conscious and should plant their feet firmly on the earth once more; it was a healthy impulse for them to try and regain the speed and directness of narrative style that seemed to have been lost for so long, to break out of the confines of a modern "literary English" towards the colloquial and the vernacular; . . . . . .

*John Lehmann*

माझे मित्र शंकरराव साठे — बाकी, खुद्द शंकरराव सुद्धां आश्चर्य करतील कीं मी कधींपासून यशवंतरावांचा मित्र झालों? मी ना त्यांचा गांवकरी, ना शाळू-सोबती; ना त्यांच्या व्यसनांतला, ना व्यवसायांतला; ना समवयस्क, ना शेजारी. वयाच्या दृष्टीनें तर मी त्यांच्या मागाहूनच्या पिढींतला. असें असून देखील, मला मित्र म्हणायचा हा काय त्यांचा गळेपडूपणा? कां प्रस्तावना लिहायचा मी त्यांना मोठेपणा दिला, म्हणून मित्रत्वाच्या पदवीनें त्यांनीं मला औपचारिकपणें भूषविलें?

शंकररावांनीं असें आश्चर्य व्यक्त केलें तर तें रास्तच होईल. कारण, माझ्याकडे प्रथम जेव्हां हें काव्य वाचावयास आलें तेव्हां मी चाफळास होतों. 'शंकर साठे, कराची' ह्या नांवाखालीं ज्यांचें लिखाण मी वाचीत आलों ते हे साठे

नसून, 'छापील संसार' नाटकाचे कर्ते ते हे, एवढेंच मला प्रकाशकांच्या पत्रावरून कळलें. तरी पण, हे साठे कोण हें माझ्या लक्षांत येईना, — मग ते माझ्या बैठकींतले असण्याची गोष्ट दूरच! पण, चाफळास हें काव्य वाचून काढलें तेव्हांपासूनच हे अज्ञात गृहस्थ माझे मित्र झाले. ज्याच्या वाङ्मयांत मनाच्या निरामयतेचें प्रतिबिंब दिसून येतें, त्याचेबद्दल सुहृद्भाव जागृत होतो. सामान्य वाचकालासुद्धां त्या लेखकाबद्दल आपलेपणा वाटूं लागतो — त्याच्या विषयींचा अनोळखीपणा लोप पावतो. एकाद्याची गांठभेट हमेश होत असून देखील, जर त्याचें मन आपणास एकाद्या बंदिस्त तळघराप्रमाणें गूढच राहिलें तर त्याचेबद्दल, केवळ परिचयाच्या आधारावर, स्नेहभाव वाटूं लागेलच असें नाहीं. उलट मनुष्य अनोळखी असूनही, त्याच्या मनाच्या निरामयतेची साक्ष जर आपणास मिळाली तर त्याचेविषयीं आपले मनांत स्वाभाविकच आपुलकी उद्भवते. त्यांतून, शंकरराव तर आपल्या काव्याच्या रूपानें — 'कवि' नात्यानेंच मजपुढें आले; आणि त्यांचें हें काव्य इतकें प्रभावी कीं, माझें मन त्यांना एकदम 'मित्र' म्हणून संबोधण्यास प्रवृत्त झालें. अगदीं प्रारंभींच "माझे मित्र" हें जें उपपद माझ्या लेखणींतून उतरलें त्याच्या मुळाशीं ह्यापरती काय मीमांसा असणार?

आवडलेल्या ह्या काव्याचें नांव "तो आणिक ती"! हें नांव वाचूनच लोक म्हणतील कीं 'हें काव्य कीं विनोदकथा'! 'चित्रा' साप्ताहिकांतील त्या सदराची आठवण असणाऱ्या वाचकांनीं तसा तर्क केला तर त्यांना तरी नांवें कशीं ठेवावींत? राघवीयपरिवाह, दंडदंडना, सौमतेयसमुद्धार अशांसारखीं अवघड नांवें — आपल्या बुद्धिबलाचा दिमाख दाखविण्याची छुपी ईर्षा बाळगणाऱ्या, नारीकेलपाकाच्या भोक्त्यांना मनपसंत असणारीं अशांसारखीं नांवें आतां कुणाला पेलेनाशीं झालीं — मागें पडलीं. तंतुवायनिकाय, धेन्वास्यशास्यता हीं विनोदात्मक काव्यांचीं नांवें आहेत, हें तर आतां कुणाला खरें सुद्धां वाटायचें नाहीं! पण 'आह्मां घरीं धन शब्दाचींच रत्नें' असें (निस्संग तुकारामाच्या अभंगवाणीआडून) सांगून, लोकांना 'गन्ध-धन' वाटायला काय हरकत होती? द्राक्षकन्येच्या चाहत्यांना रुचेल असें तरी लुसलुशीत नांव द्यायचें? नायक-नायिकेचीं मधुमधुर नांवें, त्यांचीं 'विहार'स्थळें, त्यांच्या अंतरंगांतील विशिष्ट 'लहरी' किंवा 'तरंग', असें कांहींच कसें काव्यात्म नांव सुचलें नाहीं? मधुकर, प्रमिला आणि मोहन हीं जीं या काव्यकथेंतील पात्रांचीं नांवें आहेत तीं काय काव्यमय नाहींत? उद्यां सकाळीं आपल्याला पाहायला येणाऱ्या स्थळाची कल्पना करण्यांत सौभाग्यकांक्षिणी

प्रमिला आदल्या रात्रीं जेव्हां तळमळूं लागली तेव्हां तिनें देखील मनांतल्यामनांत त्या स्थळाच्या नांवाचा खारे-गोडेपणा आजमावून पाहिला होता —

उद्या सकाळीं येणारें स्थळ । कुणास ठाउक कसें निघेल
जरा ऐकल्यापासुन नांव । आला होता जिवांत जीव
नांव तरी नाहीं टाकाऊं । 'मधुकर' वाटे रेशमी मऊ
असतें भास्कर, त्र्यंबक, हरिहर । तर मग?– आटपला बाजार!
मनांत तिज जरि 'मोहन' प्यारें । 'मधुकर' नव्हतें इतुकें खारें!

वधुमनाचा चाळा इतका बारकाईनें ज्यानें हेरला आहे त्याला वाचकवर्गाची अभिरुचि आजमावता कां येऊ नये? सारांश, ह्या काव्यकथेच्या नांवापासूनच परंपराभिमानी रसिक खळखळ घालायला सुरुवात करतील. पण काव्य वाचून झाल्यावर त्यांचें त्यांनाच पटेल कीं, ही कथा तशी कांहीं कुठल्या विलासमंदिराभोंवती किंवा कुंजोपवनांत गुंफली गेली नाहीं; हींमधलीं माणसें कांहीं धन-कनक-संपन्न नाहींत; आणि त्यांचीं आयुष्यें प्रबळ भावनेच्या भोवऱ्यांत गटंगळ्या खात नाहींत किंवा विशेष झळझळीत व्रताच्या वधस्तंभावर टांगलेलीं नाहींत! ह्या व्यक्तींचीं नांवें सुद्धां विशेषनामें नसून (सर्व-) सामान्य नामें आहेत. ज्या नांवांत विशेषपणा नाहीं त्यांनीं काव्यकृतीला भूषविण्यांत काय अर्थ? आणि, विशेष नामें सुद्धां जर सामान्य नामांसारखीं ठरतात, तर त्यांच्या-बद्दल दर्शकसर्वनामेंच वापरणें सोयीवार नाहीं का? हें काव्य वाचतांना कोणाही नागर-वाचकाला आपल्या सभोंवतालच्या वाटेल त्या ''तो-नि-ती''ची इथें कल्पना करायला यावी इतकीं ह्या कथेंतील मधुकर-प्रमिला सामान्य माणसें आहेत – प्रातिनिधिक आहेत. तेव्हां, कथावस्तूची प्रातिनिधिकता नि सार्वत्रिकता व्यक्त करणारें हें नांव अगदीं यथोचित आहे. कालमानाप्रमाणें विषय उद्‌भवतात, विषय व काळ ह्यांना अनुसरून तंत्र पालटतें आणि काळ, विषय व तंत्र ह्यांच्या कलानेंच भाषाही बदलते. 'विरहतरंग' लिहितांना माधवज्यूलियनांनीं अवलंबिलेली रचनापद्धति व भाषाशैली 'सुधारक' काव्यांत नाहीं; आणि 'सुधारक' लिहून घटलेला हात 'नकुलालंकारां'त नाहीं. एकाच कवीच्या ह्या तीन कलाकृती. प्रत्येकींत आपापल्यापरीनें, विषयानुकूल भाषा व घडण आणि अन्वर्थक नांव हीं दिसून येतात. पण प्रकृतिभेदानें प्रत्येक कृतींत भिन्नत्व आलेलें आहेच.

प्रस्तुत काव्याच्या नांवापासून तो रचनेपर्यंत आणि भाषेसहित उपरोक्त विधानाची साक्ष पटेल. माधवज्यूलियन यांच्या 'सुधारक'–शैलीची आठवण व्हावी

अशीच ह्या काव्याची उठावण आहे. 'प्रिय वाचक हो' अशी सुरुवात करून, लगेच ह्या संबोधनाला–

— — ही आरोळी
म्हणाल ऐकुनि 'कोण मवाली'

अशी झणझ ीत कलाटणी दिली आहे. कवि आणि मवाली ! कवीची समाजांत आज कशी हेटाळणी होत आहे हें एकाच फटकाऱ्यांत एकीकडे चित्रण केलें आहे, तर दुसरीकडून क्लिष्ट कल्पना, व्याकुल प्रणयालाप, निर्जीव काव्यतंत्र, अवजड शब्दार्थ वगैरेंच्या भारानें मिरविणारे कवि-लक्ष्मीधर हेटाळले जावेत ह्यांत नवल काय, असेंही मिष्कीलपणें सूचित केलें आहे. आणि हें खरेंच आहे. आज नुसत्या तंत्रमंत्रावर भाळण्याचा काळ नाहीं. वैयक्तिक सुखदुःखाच्या आलाप-विलापांत कितीहि मनोज्ञता असली, सूक्ष्मता असली, उत्कटता असली तरी, वाङ्मयाच्या कसोटीला आज आणखी एक निकष लावण्यांत येत आहे. जीविताशीं मुकाट मनानें, तडजोडीनें, आंधळेपणानें, बोथट भावनेनें नांदणें कविमनाला जमत नाहीं. पुसट झुळुकेनेंही थरथरणाऱ्या पानाप्रमाणें किंवा किंचित फुंकरानेंही चावळून चवताळून चपळाईनें फणा काढणाऱ्या नागाप्रमाणें कविमन तल्लख असतें. वैयक्तिक जीविताच्या तोकडेपणांतून, अनुभूतीमधून त्याचे उद्‌गार उमटत असतात आणि उमटावेत; पण त्याचें वैयक्तिक जीवित तरी तो ज्या समाजांत नांदत असतो त्या समाजाचाच अंश असल्यामुळें त्याच्या आलाप-विलापांत समाजाला "आपलेपण" आढळलें पाहिजे. The present is a destructive element असा वर्तमानकाळाविषयींचा आक्रोश युरोप खंडातूनच काय, तो ऐकूं येत आहे असें नाहीं. येथील वातावरणही सडूं लागलें आहे आणि ज्यांच्या आड्याखालीं समाज नांदत आहे त्या 'इमारती' तडकूं लागल्या आहेत. अशा काळांत In reading poetry today we are necessarily more interested in the writer's social attitude than in looking at his work as 'a fact of mind'. सामाजिक दृष्टिकोन लेखकाला आहे कीं नाही हें शोधण्याकडे, तो आपणाला कुठवर नेऊन पोंचवितो हें पाहण्याकडे वाचकांचा अधिकाधिक कल होऊं लागला आहे. आणि ह्या आधुनिक कसोटीला ही काव्यकथा उतरेल.

गोष्ट आमुची साधी-भोळी । नसे खुमारी त्यांत वेगळी

असें सांगून

लिहीन ओळी सुचतील तशा । अन् गुंडाळिन लगेच गाशा

असा निर्वाळा दिला आहे. सुचेल तसेंच कवीनें लिहिलें आहे; आणि भाषेच्या आवडंबराला फांटा दिला आहे. वाङ्मयीन भाषेचा कित्ता रा. साठे ह्यांनीं गिरवलेला नाहीं आणि तिचें व्यावहारिक स्वरूपच इथें कायम ठेवलें आहे, हें, उद्‌धृत केलेल्या थोडक्या ओळींवरून सुद्धा ध्यानांत येईल. हें वैशिष्ट्य प्रस्तुत कथेपुरतें तरी मला अभिनंदनीय वाटतें. प्रस्तुत लेखाच्या शिरोभागीं दिलेल्या अवतरणांत ज्या गुणांचा व प्रवृत्तींचा गौरवपर उल्लेख केला आहे त्यांचें रा. साठे ह्यांच्या काव्यांत प्रत्यंतर येत आहे. साधेपणा पुष्कळ ठिकाणीं ओबडधोबडपणापर्यंत पोंचला आहे. थोड्याशा फिरवाफिरवीनें सफाई कशी आली असती ती पहा—

| मूळ | परिष्कृत |
| --- | --- |
| समवयस्क विद्यार्थी भंवतीं<br>नजरेसमोर तिजला दिसती | विद्यार्थी समवयस्क भंवती<br>तिजला नजरेसमोर दिसती |
| कशा त्रास हा उगाच घेशी | त्रास उगिच हा कशास घेशी |
| अशींच मज लाभे का दौलत | मिळेल का मज अशीच दौलत |
| आक्रंदून रडाया लागे<br>मधुकर झटतो कराया उगे | लागे आक्रंदून रडाया<br>मधुकर झटतो उगें कराया |
| गेली कशी तरी वर्गावर<br>शेळी जणुं खाटकासमोर | कशी तरी वर्गावर गेली<br>जणू खाटकासमोर शेळी |

येणेंप्रमाणें फिरवाफिरव करून अनेक ओळी यति-नियमानुसार व उच्चारसुकर बनविणें कांहीं कठिण नव्हतें. तें न केल्यामुळें, ओघ खटकल्यासारखा होतो. तरीपण विनोदाच्या वाफाऱ्यानें पिकविलेलें हें फळ आहे, हें लक्षांत घेणें जरूर आहे. इंग्लंडमधील आधुनिकांतील अग्रेसर कवि डब्ल्यू. ऑडेन ह्याच्या सामर्थ्याबद्दल असें म्हटलें आहे कीं To write prosaically and still be a poet! साठे ह्यांची प्रस्तुत काव्यरचना पाहून मला ऑडेनबद्दलच्या ह्या उद्गाराची आठवण होते.

'सुचेल तसेंच लिहून गाशा गुंडाळला आहे' असें सांगण्यातला दुसरा हेतु असा कीं, परिणत प्रज्ञेचा तिळमात्रही डौल न दाखवता, कथा आटोपती घेतली आहे. तरी सुद्धां —

तो आणिक ती बसती सन्मुख । तिथेंच झळके स्वर्गीचें सुख
मानवतेच्या मूर्ती दोन । विश्व टाकिती अवघें भरुन
विश्वामधुनी वगळा तो ती । उरेल नुसती फत्तर माती

अशा दृढविश्वासाची बैठक आपल्या काव्याला आहे ह्याची कवीनें जाणीव करून दिली आहे.

एल्. एल्. बी. च्या दुसऱ्या वर्षांत असलेला 'तो' आणि कॉलेजांत शिक्षण घेत असलेली 'ती'! गोष्टीला इथून सुरवात आहे. त्यांची गांठ, कादंबऱ्या-काव्यांतून उतास चाललेल्या प्रणयाच्या मार्गानें पडलेली नसून, धोपटमार्गी वडील मंडळींच्या मध्यस्थीनें घातली गेली आहे. दोघेही एकमेकांचें निकोप मनानें स्वागत करतात — परस्परानुकूलतेनें स्वीकार करतात. उमेदीनें प्रपंच थाटतात व प्रपंचांत एकमेकाला पूरक होतात. कालानुक्रमानें पदवी-परीक्षा उत्तीर्ण होतात आणि तशांतच पुत्रवत्सल होतात. मातृपदप्राप्तीनें तिला आपल्या आकांक्षांचा चूर झाला असें वाटतें, चूल नि मूल ह्यांतच आपलें जिणें झडून जाणार, ह्याचा तिला भयंकर धक्का बसतो; आणि त्याची वकिली-उमेदवारी फलद्रूप होण्याचा रंग दिसत नाहीं. अखेर, दोघेही मास्तरकी पत्करतात आणि ती तरी टिकायला हवी म्हणून, अजाण लेकराला आजोळीं ठेवून,बी. टी. साठीं निघून जातात. कथा इतकी साधी आहे.

इतकी जर कथा साधी आहे तर कवीनें तिच्यासाठीं १०७ पानें कशाला खर्ची घातली ? आणि आपण तरी ती नजरचालीनें तुडवीत जा कशाला ? असें जर वाचक म्हणतील तर मात्र ते मोठा ठेवा हातीं येऊन दवडतील! विद्यार्थ्याच्या खोलीची-

हँगरची बांधुनि मुंडावळ । इथें पहुडली कॉट खुशाल
पिवळ्या हत्तींचा हा तांडा । बसला येथें घालुन मांडा
अडगळींत त्या मधेंच दिसतो । ग्रेटा गार्बोचाही फोटो

ही सजावट जितकी नमुनेदार तितकीच सहेतुक आहे. कारण त्याच्या जीवितांत

(आणि म्हणूनच खोलींत) 'ती' येतांच झालेल्या क्रान्तीचें वर्णन करतांना ह्याच वस्तू लेखकाला हातीं लागल्या—

प्रमिलेच्या डोळ्यांस बोचली । गार्बोची प्रतिमाहि बिचारी
तिच्या ऐवजी मग डौलांत । छबी स्वतःची ठेवी तेथ
सिगारेटची गेली राख । दिसे बांगडी फुटकी एक
खिशांत केव्हां हात घालतां । लागे चुरगळलेला कपटा
सुकलेल्या पाकळ्या नि वेणी । तिनें ठेविली केव्हां भरुनी

कॉलेजमधील सहशिक्षणांत विद्यार्थिनींच्या मनाची होणारी तारांबळ, विवाहासंबंधी येणारी जाग, घोळूं लागणारे विचार आणि प्रत्यक्षांत घडणारा प्रकार, ह्यांचेंही असेंच सुंदर वर्णन आहे—

काव्य-भराऱ्या मनांत कसल्या । त्या सगळ्या जागींच गोठल्या
कुठें नायिका पुस्तकांतली । आणि कुठें पत्रिका-कुंडली
कुठें तयांचे मधु गुंजारव । आणि कुठें गण-देव नि दानव
कुठें विनोदी ते कोटिक्रम । आणि कुठें हें स्थावरजंगम
कुठें मुग्ध प्रणयाची भाषा । कुठें मंत्र, भटजी अन् ताशा!

शेवटीं घरकामांतच जर खितपायचें तर पदवीधर होणें म्हणजे—

रिकामपणचा झाला चाळा । अर्थ यशाला काय वेगळा

असें प्रमिला उद्गारते. संसाराची मांडामांड केली त्या पहिल्याच दिवशीं मधुकरानें—

कसा तरी शेवटीं बनविला । प्रथम चहा संसारामधला
जरी सांडला चहांत चोथा । अमृतापरी भासत होता!

वकीलींतील निष्फळ उमेदवारी म्हणजे—

मनांत म्हणतो "कष्टाचे क्षण । ही तर श्रेष्ठपणाची खूण"
बेकारीला आली आतां । कठिण व्रताची थोर प्रतिष्ठा

बाळंतीण प्रमिला बाजल्यावर—

दुरून त्याला भासत होती । भिजलेल्या वाटाण्यासम ती!

प्रमिलेनें मास्तकीचा पेशा पत्करून घरीं त्याची रंगीत तालीम करायला सुरुवात केली त्यावेळीं—

मधुकर आतां ठायीं ठायीं । म्हणूं लागला तिजला "बाई"
तीहि म्हणे मी असे मास्तरिण । बाकावरती उभे करीन!

शाळेंत शिकवतांना, घरीं ठेवलेल्या तान्हुल्याची घडोघडी आठवण येऊन माऊलीचा जीव त्याच्याभोवतीं कसा घोटाळत असे ह्याची आत्यंतिकता चितारतांना

पहिलीमधली मुलगी छोटी
अगदीं मोहनइतुकी नकटी

असा तिला भास झाल्याचें कवीनें सांगितलें आहे.

"लग्नें तरुणांची जमवावी । गोडी वृद्धानींच लुटावी" ही ज्यांची समाजसेवा, अशा एका हौशी उलाढाली पेन्शनराच्या मध्यस्थीनें ह्या 'तो नि ती'ची लग्नगांठ घातली गेलेली असते. शेवटीं, हें दोघांचें मेहुण बी. टी. साठीं चाललें असतांना त्यांची नि त्या पेन्शनराची गांठ नेमकी गाडींत योगायोगानें घालून देण्यांतली लेखकाची सावधानता नजरेंत भरते. कारण, तो पेन्शनर अशाच एका स्नेह्याच्या वधूला दाखवायला घेऊन चाललेला असतो आणि वरती ह्या दंपतीच्या नकट्या मोहनला म्हणतो —

"अरे गुलामा!– तुझा बापुसऽ—
वेडा भीत असे लग्नास
भिऊन जाऊं नको तूं तरी
शोधुन आणिन मी तुज नवरी"

क्रिकेटच्या भाषेंत बोलायचें म्हणजे अखेरचा षट्काराचाच टोला हा! सारांश, हृदयंगम विरोध, नाजुक विनोद, परस्परानुरक्त दंपतीच्या निर्व्याज मनोवृत्तींतून उत्पन्न होणारा प्रेमळ गोडवा, हृदयस्पर्शित्व, हळुवारपणानें भरलेली रंगत, हीं पानोपान पसरलीं आहेत; ती किती म्हणून इथें उतरावी? गुलमुशीच्या फुलांना रंगाच्या शिडकावानें जशी अधिक रमणीयता येते तशी विनोदाच्या शिडकावानें ह्या काव्यकथेला रंजकता आली आहे. चित्रणांतील वेचक सूक्ष्मता फारच मनोहर आहे. विद्या-

र्थ्याची खोली असो कीं बाळंतिणीची खोली असो, वकीलींतली उमेदवारी असो की मास्तरकीची पूर्वतयारी असो, वैवाहिक सौख्यासंबंधींचे विद्यार्थीदशेंतले मनोरथ असोत कीं वास्तवतेचे पडताळे असोत, संसाराची मांडामांड असो कीं बी. टी. साठीं प्रयाण करण्याच्या वेळची निरवानिरव असो, सर्व ठिकाणचें चित्रण इतक्या सहानुभूतीनें आणि समरसतेनें केलेलें आहे कीं आपण पुस्तक वाचत नसून साक्षात चलत् चित्रपटच पाहात आहोंत असा आभास होतो.

पण हे परिश्रम कशासाठीं आणि कवीला ह्या कथेच्या निमित्तानें काय म्हणायचें आहे, हा प्रश्न शेवटीं पुढें येतो. संसारांतील सुखदुःखांच्या झुळुकांनीं मनाच्या कुरणावर उमटणाऱ्या लहरी रंगविणें एवढाच ह्या लिखाणाचा हेतु असेलसें वाटत नाहीं. सुशिक्षित म्हणून सामान्य जनता ज्यांच्याकडे बोट दाखविते त्यांच्या संसारांत त्यांची कुत्तरओढ कशी चालू आहे हें एकीकडून दाखविणें हा एक हेतु तर स्पष्ट दिसतोच. पण त्याचबरोबर, समाजाची ऱ्हासकळा जे निवारतील, जे नवीन इतिहास बनवतील, म्हणून अज्ञ जनता ज्या सुशिक्षित बंधु-भगिनींकडे आशेनें दृष्टी लावून आहे ती सुशिक्षित तरुण पिढी, तसें विशेष कांहीं करून दाखविण्यास कशी असमर्थ आहे, हेंही कवीस दाखवायचें आहेसें दिसतें. अर्थात, आशा बाळगणारांची फसवणूक होत आहेच आहे; पण खरी विदारक वंचना आहे ती ही कीं, शिकलीसवरलेली, मिळवती झालेली, धट्टयाकट्टया मनाची, आल्या परिस्थितीला तोंड देणारी अशी जरी तरुण पिढी असली तरी ती आपल्या ठिकाणी असमाधानीच आहे, हें कवीला मुख्यत: दाखवायचें आहे; प्रपंचाचा खटारा ओढण्यापलीकडे कांहीं करूं शकत नाहीं ह्या दुबळाईनें ती अस्वस्थ आहे. संसार हा प्रवाहपतितांचा आहे,—पदवीच्या मागें लागलेल्या, ती मिळविलेल्या तरुण-तरुणी जरी ध्येयमार्गावर असल्यासारखी भासली तरी त्याही प्रवाहपतितच होय आणि मिळालेली पदवी ही त्या प्रवाहांतील बेट किंवा फांदी होय—कीं ज्यांच्या आधारानें जरा पाऊल टेकतां येते, गटंगळ्या खातांना आधार गवसतो. वैयक्तिक प्रपंच आणि समाजोद्धाराचा परमार्थ यांचा मेळ बसत नाहीं. नुसत्या प्रपंचांतच रममाण होऊन राहण्याइतका मनाला एकमार्गीपणा राहिला नाहीं, डोळ्यावरची झापड उडाली आहे, दृष्टी फाकल्यासारखी वाटते, हातून कांहीं तरी अलौकिक घडावें अशी मोघम जागही आलेली असते—मनाला रुखरुख लागून राहिलेली असते, पण निश्चित ध्येयाचें आकलन होत नाहीं—आरसांटा येत नाहीं,

अशी ही जी तथाकथित सुशिक्षितांची अवस्था झाली आहे ती पुढें मांडून

दृश्य विदारक किती भकास । कुणाकडे परि त्याचा दोष?
वळकट घेउनिया हे वेत । कोण वळेल तयां एकत्र?
पांगुनि फुटणारी ही शक्ति । ओतिल एका बिंदूभंवतीं?
विचारसामर्थ्याचे हे थर । रचुनी भक्कमशा पायावर—
कोण रचे उत्तुंग इमारत । भिडेल जी जाउनि गगनांत?
बुद्धीचे हे जिवंत निर्झर । बांध आडवे पडले त्यावर
वेगवेगळीं झालीं डबकीं । गाळ तळाशीं किती पहा कीं
कोणी यांतुन कोंडी फोडुन । ओतिल कां त्यांच्यामधिं प्राण?

हा प्रश्न कवीनें विचारला आहे. निव्वळ पदवीमागें लागलेल्या अखिल तरुणपिढीचा हा प्रश्न आहे!

मराठी कवितेला ओहोटी लागली आहे, असें कोणसें म्हणाला. कोणी तरी त्याची री ओढली, आणि कोणी कांहीं कारणेंही आपापल्या परीनें पुढें केलीं. पण त्याच सुमारास, 'तसं कांहीं खरं नाहीं' असें सांगणाऱ्या कविता-कृती उदय पावल्या. भरती ओहटी मोजण्याचीं तशीं कांहीं गमकें नाहींत. वाङ्मयाच्या इतिहासांत ५।६ वर्षांचा काळ, म्हणजे अशासारखें निदान करण्याइतका मोठा काल नव्हे. आणि विकार-विचार-प्रकटीकरणाचे नवेनवे प्रकार वाढल्यामुळें, विशिष्ट स्वरूपानेंच काव्य प्रगटलें नाहीं, म्हणून "काव्याला ओहोटी लागली" असें समजून भयभीत होऊन जाण्याचें कारण नाहीं. त्याचबरोबर, हेंही पाहिलें पाहिजे कीं, हा काळच असा संक्रमणाचा आणि अनिश्चिततेचा आहे कीं कविवाणीनें मौन धरलें तर नवल नाहीं—

Life today is lived in the intervals between one crisis and the next, in a world where widespread poverty and acts of cynical cruelty and atrocious violence appear to have become almost the normal condition of things. Under such circumstances it is hardly surprising if modern poetry is fragmentary, or if the modern poet is uncertain of himself or the civilization

that, in former times, he was once proud to call his own.

— *Philip Henderson*

सगळ्या जगाची जी दशा झाली आहे तिच्या झळा, आपल्या इकडे लागल्याशिवाय कशा राहतील? प्रस्तुत कथेपुरतें म्हणजेच तिच्यांतील वर्गापुरतें बोलायचें झालें तरी सुद्धां "लग्नें तरुणांची जमवावी । गोडी वृद्धानींच लुटावी" ह्या अभिनिवेषानें मंगल कार्यें पार पाडणाऱ्या वृद्धांची करणी म्हणजे Cynical cruelty च होय आणि मग त्या संसारांत अपत्यसंभव हा atrocious violence च नव्हे काय?

स्वतः कवीनें कांहीं निर्णायक मत दिलें नाहीं, विधायक कार्यक्रम सुचविला नाहीं, संशयग्रस्ताप्रमाणें नुसता प्रश्न टाकला आहे, असे कुणी आक्षेप घेतल्यास The poet is not under the obligation to furnish the reader with a ready-made historical solution for the future of the conflict which he describes हें एंजलचें वचन, वाचकांच्या कानांवर घालून ठेवून,

प्रिय वाचकहो, पुन्हा विनंती
सांभाळुन घ्या "तो आणिक ती"

असें कवीच्या वतीनें कवीच्याच शब्दांत विनवून, बराच वेळपर्यंत ताणून धरलेला हा अंतरपाट दूर करतों.

पुणें शहर
१२-१०-१९४१

"यशवन्त" दिनकर पेण्ढरकर

# कांहीं महत्वाचीं संग्रहणीय पुस्तकें

(१) राजकवि तांबे यांची समग्र कविता (कै. डॉ. मा. त्रि. पटवर्धन यांनी परिश्रमपूर्वक संपादिलेली नि सुधारुन वाढविलेली दुसरी आवृत्ति) ... ... ... किंमत दीड रुपया

(२) नकुलालङ्कार (कै. माधव जूलियन यांचे शेवटचे खण्डकाव्य) ... ... ... किंमत एक रुपया

(३) यशोनिधि (राजकवि यशवन्त यांचा अगदीं अलीकडील स्फुट कविता संग्रह.) ... ... ... किंमत सवा रुपया

(४) वन्दे भारतम् (आचार्य अत्रे यांचे विनोदी नाटक) किंमत एक रुपया

(५) मी उभा आहे ( ,, ,, ,, ) किंमत एक रुपया

(६) पराचा कावळा ( ,, ,, ,, ) किंमत एक रुपया

टपालखर्च वरील किंमतीखेरीज निराळा पडेल

## न वी न  कि ता ब खा ना

पुणे २ ◈ ◈ ◈ मुंबई ४

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
६७२९

# प्रिय वाचकहो—

'प्रिय वाचकहो—' ही आरोळी
म्हणाल ऐकुनि, "कोण मवाली?—
दिसतो आहे अस्सल 'कवडा'
कुठली आम्हांमागें पीडा!
कुणी भेटण्याचा अवकाश—
काव्यगायनाची ये ढास!
विश्व जाहलें तेव्हांपासुनि
पुरतें भंडाविलें कवींनीं
येतां दारापुढें भिकारी
हाकलतां त्यां येतसे दुरी
'वाचकहो—' हा कवि-हंबरडा—
त्यांतुनि सुटणें—गोष्टच सोडा!"

शिव्या शेलक्या अन् आक्षेप—
तळतळाट, संताप नि शाप—
ऐकुनि घेतों सर्व निमूट
(तुमच्याशींच अखेरी गांठ!)

कबूल सगळें; या जगतावर
जात कवींची हरामखोर!
काव्य एकदां पुरतें ऐका
असे एवढा एकच हेका
काव्य-डोस मीं पाजल्यावरी
खुशाल मोजा ना लाखोली!

वाचकांविणे कवी लंगडे
विचित्र आहे असें त्रांगडें
वाचक जर औषधास नाहीं
'कवी' म्हणुनि कोठली बढाई?
फुटती पाय जरी रसिकांना
खलास होई सर्व जमाना!
क्षुब्ध होइ जरि प्रतिभासिंधू
शिणवूं मग कोणाचा मेंदू?
क्लिष्ट कल्पनांचा हा गुंता
सतावील कोणाला पुरता?

## तो आणिक ती

लयला-मजनूच्या इष्काची
कुठें चालवूं पोपटपंची?
काव्यलेखनांतल्या हिकमती
मिरवूं मग मी कोणापुढती?
पायमोडके शब्द बघा ना—
इथे उघडला कत्तलखाना!
टाकुनि शब्दांवरी आंकडे
'टीपां'चे पाडीन मग सडे
प्रेम आंधळें–काव्यें त्यावर—
खरडुनि अंध जरा हो नजर
म्हणुनि सुचवितों–सोळा, सत्रा–
बघूं नका त्या मोजुनि मात्रा!
ह्रस्वदीर्घ यांचा जरि भंग–
भावनांस लाविले सुरुंग!
उद्‌गारांची तयार रास
उपमांचे सांचे भरघोस
वेळ भागवुनि नेण्यासाठीं
शब्द फालतू हे खाकोटीं!

प्रिय वाचकहो, किती तयारी
तुमच्यासाठीं केली सारी!
गिऱ्हाइकी पटल्यावांचून
बंद करावें कसें दुकान?
मनांत मोजुनि शंभर अंक
राग गिळा; या ऐकुनि हांक
तुमच्यासाठींच वगळलेला
काव्याचा उडवितो भुइनळा!

गोष्ट आमुची साधीभोळी
नसे खुमारी त्यांत वेगळी
'पेंच', 'दुवे', 'खटके', 'आडाखे'
नसती असले तंत्रतडाखे!
'निरगांठी' अन् 'उकल' अशांचें
तंत्र कोठलें झेंपायाचें?
'बिंदु', 'कळस', 'संग्राम' 'अखेर'
असती माझ्या अकलेपार!
लिहीन ओळी सुचतील तशा
अन् गुंडाळिन लगेच गाशा

असल्या साध्या गोष्टीसाठीं
दोन घेतलीं पात्रें हातीं
मुख्य एक त्यांतलें असे 'तो'
म्हणाल, "दुसरें मी ओळखतों
'तो' हें जेथें पात्र नाचतें
'त्या'च्या भंवतीं 'ती' घुटमळते!
गोष्ट असे ही पुरती माहित
असेल 'तो' अन् 'ती'ची कटकट!"
म्हणाल, "काव्यां कशा बरें 'ती'?
लुटा सृष्टिशोभासंपत्ती
अरुण पहा, सूर्यास्त पहा हा
उजळत्या पहा या दिशा दहा
जंगल पसरे दाट केवढें
पहा पठारें, दऱ्या अन् कडे
कोकिळ गाती, रडती घुबडें
प्रतिध्वनी हे घुमत केवढे
उंच टेकड्यांच्या उतरण्डी
सळसळत्या वाऱ्याची धुंदी

घ्या हा 'कच्चा माल' त्यावरी
उठवा मंदिर संगमरवरी
निसर्ग असतां तुम्हांपुढती
कशा हवीं मग 'तो आणिक ती'?"
म्हणाल, "त्यांचें प्रस्थ वाढलें
शेफारुनि डोक्यावर चढले
इथुनि हांकला 'त्यां'स एकदां—
खास पुरवला लसूणकांदा!"

जरा शांत व्हा—असें पहा कीं
जगांत जें घडतें त्यापैकीं—
'तो' आणिक 'ती' पार वगळतां
येई काय बरें मग हातां?
इतिहासाचीं सगळीं पानें
रचिलीं कोणीं?— 'तो' अन् 'ती' नें
पर्वत, सागर, नद्या ही जरी
निसर्गशोभा असे भरजरी
'तो' जर नसता 'ती' जर नसती—
उरती केवळ फत्तर माती!

## तो आणिक ती

सूर्य उगवला किंवा विझला
कोण कौतुकें पुसे त्याजला ?
वीज लकाके–सागर उसळे
मधेंच कोठें तारा निखळे
हीं सौंदर्यं क्षण लुकलुकती
काळाच्या उदरांत हरपती
अमर भासते त्यांची दीप्ती
कारण त्यांना बघती 'तो' 'ती' !
निसर्ग ठरला अतीव सुंदर
(दुरुनि साजरे असती डोंगर)
भंवतीं सगळा धूरधुराळा
केर सांचला अन् पाचोळा
नद्या चालल्या चिखल घेउनी
दुर्गंधी ही भरली रानीं
निर्विकार हे पर्वत सगळे
उंचावरुनी पहात बसले
शतकें झालीं कितीक; त्यांना—
काळाची नाहींच कल्पना

युद्धें, सांथी, उपासमार
मनुजावर यांचा भडिमार
कठोर फत्तर बघती सारे
रेसभरीही पाय न हाले
कणाकणांनीं मरत शेवटीं
होई त्यांची माती माती
सौंदर्याचा अंशहि इतुका
निसर्गांत या आढळतो का ?
सौंदर्याचा पोकळ डौल
लटक्या श्रेष्ठपणाची झूल
निसर्गावरी चढली खोटी
कारण त्याला 'तो' आणिक 'ती'
त्यांची दृष्टी जिथजिथें वळे
नंदनवन मग तिथेंच नटलें !
'तो' आणिक 'ती' बसती सन्मुख
तिथेंच झळके स्वर्गीचें सुख !
निसर्गांतली घाणहि सगळी
'त्यां'च्या संनिध मंगल बनली !

मानवतेच्या मूर्ती दोन
विश्व टाकिती अवघें भरुन

विश्वामधुनी वगळा ‘ तो ’ ‘ ती ’—
उरेल नुसती फत्तर माती !

प्रिय वाचकहो, पुन्हा विनंती—
सांभाळुनि घ्या ‘ तो ’ आणिक ‘ ती

# आमचा 'तो'—

मधुकर त्याचें नांव चांगलें
'मव्या' हेंच परि होतें रुळलें
पुण्यास होता शिकावयासी
एल्. एल्. बी. च्या दुसऱ्या वर्षीं
दिसावयाला लहानखोर
किडकिडीत उंचेला पोर
मित्र चिडविती तयास –"लेका–
कसा शोभशिल वकील बांका ?
दिसशी अजुनी तूं विद्यार्थी
कपाळावरी चिकटव पाटी !"
खोली घेउनि टिळकरोडवर
एकटाच राहिला मुशाफिर
अरुंद टेबल एक जुनाट
कुरकुरते खुर्चीची पाठ
हँगरची बांधुनि मुंडावळ
कॉट पहुडली इथें खुशाल

हवें नको तें सगळें कांहीं
टेबलावरी पडुनी राही
सर्व पसारा रचला त्यावर
दिसे लांबुनी कुतुबमिनार
रास पुस्तकांची मोठाल्या
जळत्या सिगरेटीही सगळ्या
सुपारिच्या खांडांच्या चिमट्या
निळ्या पेन्सिली लहानमोठ्या
पिवळ्या हत्तींचा हा तांडा
बसला येथें घालुनि मांडा
मधेंच कसल्या कपट्यावरती
हिशेब गवळ्याचे हे दिसती
कॅलेंडरवर चौक तांबडे
खाणावळिचे दाविति खाडे

हायकोर्टचे निर्णय सगळे
भिंतीवरती पहा खरडले
दत्तक-प्रकरण आणि पोटगी
हिंदु कुटुंबामधली भागी
असल्या भानगडींची संथा
सहज मिळावी उठतांबसतां
म्हणुनि कायदेकानू सगळे
त्यानें भिंतीवर नोंदविले !
अडगळींत त्या मधेंच दिसतो
ग्रेटा गार्बोचाही फोटो !
थकलेल्या मेंदूस विसावा
एक कटाक्षें जरा मिळावा
म्हणुनी गार्बो घरीं आणिली—
आणि घड्याळापुढें बसविली !
परीक्षकांचा करीत धावा
दिवसभरी कायदा 'कुटावा'
नंतर अभ्यासाच्या नांवें
नळाखालतीं स्नान करावें !

परिटघडी चोळणा घालणें
सदऱ्याचीं तीं उघडीं बटणें
डोकीवरचे केस वळवुनी
(बळेंच झुपका पुढें घेउनी)
किल्ल्यांची ती लाम्ब साखळी
बोटाभंवतीं मग गुण्डाळी
गुणगुणतो एखादी ओळ
घाली बेसूर कधीं शीळ
संध्याकाळीं रोजच्यापरी
'मध्या' पडे खोलीबाहेरी

पुण्यास संध्याकाळ गाजते
फुकट किती करमणूक तेथें !
सहज कुठेंही गर्दी दिसतां
अपघाताचें कारण बघतां—
देशभक्त दृष्टीस पडे; तो—
चौकांचौकांतुनी बहकतो !
संमेलन अन् सभा, परिषदा—
रेलचेल यांचीच सर्वदा

कुठें चालतें स्वधर्मकारण
कुठें विषय परि 'संतति-नियमन'
कुणी म्हणे "ही संस्कृति राखा"
कुणी "हवें तें बेशक बहका"
आंतड्यांतुनी पीळ काढुनी
समाजास बोधामृत पाजुनि
समाजसेवक हे जरि झटती
इतरां त्यांची काय असे क्षिति?
'मध्या'सारखे सर्व हे 'बघे'
रमत राहती जरासे उभे
वक्त्यांचें गंभीर विवेचन
वाहवतें जों कानांवरुन—
हळूच घेती पाय काढता
विषय नसे हा त्यां आवडता
समाज आहे बोजड, रुक्ष
किती वेळ तरि द्यावें लक्ष?
कंटाळा घालविण्याकरितां
सहज जरा डोकावुनि येतां

दिसती जमलेले विद्वान
यावें क्षणभर तोंडें बघुन!
अथवा दिडक्या फेकुनि दोन
गुऱ्हाळांत ठोकावें आसन
रस्त्यावरचीं 'हिरे माणकें'
बघण्याचे साधावे मोके!

वक्त्यांचीं ऐकुनी बोलणीं
मध्यास वाटे कधीं टोचणी
'समाजांतले प्रश्न हे किती
आम्हां सगळे भेडसाविती
वंशव्यवस्था अन् बेकारी
धनिकांची ती मिरासदारी
नसे यांतलें अक्षर माहित
तरि मी म्हणवीं मला सुशिक्षित
काय म्हणे फ्रॉईड– कुणी...स्की—
पंतजली वा मार्क्स, वाल्मिकी
कुठल्या पानावरती कोणी
कशी मांडिली विचारश्रेणी—

कसा भराभर पुस्तकांतले
वक्ता होता देत दाखले
धन्य तयाच्या व्यासंगाला
कुठल्या झाडाचा मी पाला!
समाजाकडे लक्ष मुळींही
सुशिक्षितांचें फिरकत नाहीं
कर्तव्याला मुकलों; वाटे
धिक् माझें हें जिणें करंटें'
येती हे जों मनीं विचार
तोंच तयांचा होई चूर
खोल आंतला मग आवाज
जागृत होऊनि करतो हितगुज
'मध्या, राहुं दे समाज दूर
तुज कां त्यासाठीं हुरहूर ?
गांवामधले दे. भ. जंगी,
समाजसेवक अन् व्यासंगी
समाज दे त्यांच्या ताब्यांत
घरा लाग आठाच्या आंत!
पत्करशी जरि समाजलोण
खरडणार मग पेपर कोण ?
समाज कसला घेउन बसशी ?
पुन्हा आपटी बसेल खाशी!'
ओशाळुनियां मधू परततो
समाज त्याचा मग विरघळतो!
अडला नारायण असहाय—
धरी पुस्तकाचे तो पाय!

फार जरी कंटाळा आला
जाई रात्रीच्या तो 'शो' ला
पट्टी चघळित तोंडभरी तो
यथेच्छ पाय तणावुनि बसतो
धूम्राचे मग सोडित लोट
पाही प्रणयाची लयलूट
नायक हिंडे नायिकेसवे
(त्याला पेपर मुळी नसावे!)
प्रेमाची ती भडक थोरवी
जरा परीक्षा-कष्ट विसरवी
मुलींकडे चोरुनि कधि बघणें
हींच काय तीं प्रिया-दर्शनें!

पडद्यावरतीं बघतां चित्रें
त्यांत हवें तें चित्त शोधतें
अभ्यासाच्या जखमेवरतीं
सिंचन हें जणुं नाजुक हातीं
चित्र संपतां जड नेत्रांनीं —
येई; दिसती ग्रंथ दर्शनीं !

अंग झोकुनी दे कॉटवरी
सिगारेट शिलगावी दुसरी
ग्रंथ दूर बाजूस सारतो
घड्याळास मग गजर लावतो
ग्रेटा गार्बोकडे पाहुनी
स्वतःशींच सुस्कारा सोडुनि

अभ्यासाचे ठरवित बेत
झोप घ्यायची करी शिकस्त !

# आमची 'ती'—

जरी सावळी पोर चिचुन्द्री
कशी चिमखडी होती सुन्द्री
पुरत्या झाल्या चार इयत्ता
नव्हता येत तिला 'र' म्हणतां!
सुन्द्रीची मग थट्टा होई
अन् ती रडकुण्डीला येई
चिडवाया तिज म्हणती नाना
"नांव तुझें काय तें सांग ना"
कुणीं म्हणावें, "बोबडकांदा
नवरा तुजला मिळे शेंबडा"
सुन्द्री जाई दूर रुसोनी
कोपऱ्यामधें गाल फुगवुनी
सगळ्यांनीं मग हळूच जावें
अन् खुलवावी तिला आर्जवें
कुणीं म्हणावें "सागरगोटे
तुजसाठीं आणले पोरटे"
"ही बघ बाई नवी बाहुली
नटुनी थटुनी ठुमकत आली"
राग ओसरुन. चिमणे गाल
क्षणीं होत मग चुटुक्क लाल

तीच चिमुरडी सुन्द्री आतां
वर्षें थोडीं लोटुनि जातां
बदल केवढा तिच्यांत होई
हीच काय ती सुन्द्राबाई ?
अजुनी सुद्धां 'र' वर अडते
वेळ कशितरी मारुनि नेते!
दुरुनी वाटे गोरी झाली
अंदरकी परि बात निराळी
पावडरीनें घडली क्रान्ती
काळ्यावरतीं चढे सफेती!
झाली अठरा वर्षांची ती
डूल शोभती कानावरतीं

# तो आणिक ती

तुळशीबागेंतुनी आणिली
तिनें आंगठी बोटावरली!
पाठीवरतीं लांब शेपटा
भेट्टं पाहे डाम्बर-रस्ता
केस वीतभर-अस्सल नाणं
उरलें सुरलें तें गंगावन!
रस्त्यांतुनि मंदावत जाते
माना वेळावुनी पाहते
लहानपणची 'सुन्द्री' जाऊनि
बनली शंभर टक्के 'तरुणी'!

छान! विसरलों मुख्य गोष्ट ती
'सुन्द्री' नांव जिचें ती युवती—
'तरुणी' या पदवीला योग्य
ठरावयाचें कुठलें भाग्य?
'सुन्द्री' साठीं लायक कोण?—
उत्तर एकच-मोलकरीण!

सुन्द्री शाळेमधें घातली
पुन्हा बारसें होउन सगळीं—
नवें नांव लाविती तियेला
'सुन्द्री'ची मग बनली 'प्रमिला'!
नांव जरी बदलुनी घेतलें
'र' च्या पकडींतुनी न सुटलें!

यौवन-आराधना करावी
झाली तिज जाणीव ही नवी
मनीबॅग मग आली हातीं
तींत सांठल्या अगणित गोष्टी
काउचिऊच्या गोष्टी सगळ्या
'सुन्द्री' सहित विरोनी गेल्या
आतां कादंबऱ्या, लघुकथा
यांची चाले तिजला संथा
अस्सल नायक मर्द, सुरेख
होते परिचित तिला कितीक
आणि नायिका? त्यांपासुनि तर—
तिनें गिरविले धडे आजवर!

‘ अग्या ’ कितिदां म्हणावयाचें
हिसडे मानेला द्यायाचे
पद्राशीं कोणाचा चाळा
मांजरिचा कोणास जिव्हाळा
‘ बग्या ’, ‘ शक्या ’ चें येतां भरतें–
कोण सदा बोबडी बोलते !
कोण मनोहर ‘ ता. क. ’ लिहिते
जमीन पायानें कुरतडते !
अंबाडा चांचपून बघत—
अभिप्राय सुचवी नजरेंत !
सर्व नायिकांच्या या लकबी
इतर बारक्या कितीक बाबी—
कशा नायकां सुचती कोड्या
‘ ती ’ उलटविते त्या डरफाट्या
प्रमिलेचें हें शिक्षण सारें
होतें अद्यावत झालेलें
चुकवुनि दृष्टी ती ‘ बाईची ’
चोरुनि कादंबऱ्याच वाची !

सरली शाळा, सुटल्या ‘ बाई ’
प्रमिला कॉलेजामधिं जाई
नांव तिचें दिसतां यादींत
झालें ‘ बाई ’ चें मन शांत
‘ बाई ’ची ती उडवी त्रेधा
रडकुण्डीला आणी कितिदां
‘ बाई, लग्न कधीं हो तुमचें ? ’
खवचट प्रश्न विचारुनि डिवचे
‘ बाई ’ होई गोरीमोरी
तीच मुलींना गंमत सारी
कॉलेजीं ठेवतांच पाय
प्रमिला बनली गोगलगाय
शाळेमधला हुरूप, जोम
आणि बंडखोरी बेफाम
खोड्या मिस्किल सरल्या आतां
आली नजरेंतहि चंचलता
समवयस्क विद्यार्थी भंवतीं
नजरेसमोर तिजला दिसती

जाणतेपणाच्या सीमेवर
तेहि राहिले उभे समोर
विचार, शिक्षण, नव आकांक्षा–
दोघांचीही सारखी दिशा,
आजवरी मैत्रिणीच भंवतीं
आतां दिसती नवे सोबती
स्त्री नि पुरुष हें वर्गीकरण
आजच डोकावलें मनांतुन
मनास पुरतें कळे न तोंच
वागण्यांत आला संकोच
कोण पाहतें आपणाकडे
नजर बावरी फिरे चहुंकडे
कधीं कुणाच्या दृष्टीमधुनी
तिज भासावें 'न्यारें' पाणी!
मनास चकवुनि-केव्हां नकळे–
कुठें वळावे लबाड डोळे!
दृष्टिभेट हो जरि एकादी
लाजेनें होई शरमिंदी!

'शिक्षणाहुनी जास्त विकट हें
कोडें मज उलगडणें आहे'
अशी नवी कसली हुरहूर
मनामधें उठवी काहूर
कानावरतीं येतां 'लग्न'
नकळत जाई अंग थरारुन!
करुनी घे समजूत स्वतःशीं
"कशा त्रास हा उगाच घेशी?
डोक्यांत नको विवाह तूर्त
धरला नाहीं उद्यां मुहूर्त
अभ्यासांत असूं दे चित्त
पुढचे आज कशाला बेत?"

अशींच जाती वर्षें दोन
चित्तावरचें कमी न दडपण
'लग्न' भासतें जणुं मानेवर–
असे टांगलेली तलवार
ललितलेखनामधलीं लग्नें
स्वर्गसुखें जणुं नटलीं स्वप्नें

वघुनी त्यांचे मोहक रंग
मनोरथांमधिं होई दंग
' त्यांना लाभे विवाह-अमृत
अशीच मज लाभे कां दौलत ? '
घरांत निघती कधीं बोलणीं
प्रमिलेच्या जरि लग्नावरुनी
' मला लग्न नाहींच कधींही–
करावयाचें ' सांगुनि पाही
वडीलधारीं ' स्थळें ' आणुनी
गोत्रगणांना बघति तपासुनि
प्रमिलेच्या कानावर येई
मंगळ कोणांकोणां नाहीं
चुलत्याची इस्टेट कुणाला
मिळेल कोणा जमीनजुमला
पत्रिकेंत कुठल्या धनयोग
पिढींत कोणाच्या क्षयरोग
ऐकुनि हीं वर्णनें सवंग
प्रमिलेचें मन होइ दुभंग

काव्यभराच्या मनांत कसल्या
त्या सगळ्या जागींच गोठल्या
कुठें नायिका पुस्तकांतली
आणि कुठें पत्रिका-कुण्डली
कुठें तयांचे मधु गुंजारव
आणि कुठें गण-देव नि दानव
कुठें विनोदी ते कोटिक्रम
आणि कुठें हें स्थावरजंगम !
कुठें मुग्ध प्रणयाची भाषा
कुठें मंत्र, भटजी अन् ताशा !
कुणीं तिजकडे वळुनि म्हणावें
' प्रमिले, हें स्थळ नच गमवावें '
' चुलींत घाला तुमचें हें स्थळ '
मनांत म्हणुनी उचली पाउल
एकटीच बाहेर भटकते
मना शांतता आणुं पाहते
सर्व नायिकांपरी तियेला
' हिरो ' कोठला भेटायाला !

सुस्कारे टाकुनी बिचारी
थकुनी येते शेवटीं घरीं
' लग्न ' विसरण्यासाठीं हातीं
घेते कादंबऱ्या नि गोष्टी

पुन्हा नायिका आणि नायक
डोळ्याला दिसतात भयानक !
हळूच मग डोळे मिटतात–
कुठल्या 'हीरो 'च्या तंद्रींत !

# पहिली भेट—

वाचक, दिसलीं 'तो' आणिक 'ती'?
म्हणाल झालें काय शेवटीं?
ओळख त्यांची कुठे जाहली
प्रथम एकमेकांस भेटलीं?
कटाक्ष पहिला प्रेमभराचा
कुठे पाहिला तिनें तयाचा?
कुठल्या मोठ्या अपघातानें
आलीं जवळी दैववळानें?
तिचा घसरला मधेंच पाय
तो त्यानें सावरला काय?
नजरेमधली तिची मोहिनी
टाकी काय तया भारोनी?
दिसतां भव्य तयाची छाती
क्षणामधें विरघळे काय 'ती'?
तो आणिक ती-जमे मेतकुट
त्यास कशी झाली सुरुवात?

असें जाहलें नाहीं कांहीं
त्यांत सांठली परि नवलाई
मध्या भोजनासाठीं जाई
एका 'अमृत-भोजनालयीं'
असाच बसतां गांठुनि ताट
पडली पेन्शनराशीं गांठ!
खालीं बघुनी खडे वेंचतो
असे पेन्शनर खप्पी परि तो
गोष्टी सांगे जुन्यापुराण्या
झाडी सगळ्यावरी दुगाण्या!
म्हणे शेवटीं "कां हो राव-
तुम्हां असुनी इतुका भाव
लग्न कां बरें करीत नाहीं
कशाला हवी खाणावळ ही?
करी भात मग बायको नवी
लज्जत त्याची कशी कळावी?

कशा वेंचणें आमटींतुन–
झुरळाची शिजलेली मान ?
माझें ऐका-कशा एवढे
लग्नानांवें फोडतां खडे ? ”
मध्या बोलला मग थट्टेंत
“ कुणा नको लग्नाची बात ?
मी आहे लग्नास तयार
मुलगी कोण मला देणार ?
लग्न हा जरी शुद्ध लिलांव
अन् म्हणतां मज आहे भाव
ठरवा माझी किंमत सारी
शोधुनि आणा कोठुन नवरी ! ”

सहज मधू जरि बोलुनि गेला
प्रळय केवढा तयें माजला !
जेवण करुनी उठे पेन्शनर
तडक गांठितो नानांचें घर
पेन्शनराचा पट्टा चाले
निमूट ऐकुनि घेती सगळे

“ पहा चांगलें असलें हें स्थळ
बघतां हातांतुनि निसटेल
रोज पाहतों मुलगा डोळां
असे दांडगा अन् उंचेला
खाणावळिच्या दाठर पोळया
पांच पचवितो– ( काल मोजल्या ! )
अवथ्या घाली रोज अजून
नसे वस्तरा ओंठावरुन
केस ठेवतो माथ्यावरती
शेंडीची परि खूण पुसटती !
वडीलधाऱ्यांची मर्यादा
ही तर त्याच्या वर्तनीं सदा
केवळ माझ्या शद्वासाठीं
पत्करील लग्नाच्या गांठी ”
ऐकुनि ‘बाबां’चे हे बोल
कसें कुणा पाणी न सुटेल ?
नाना म्हणती, “सर्व ठीक; पण
नवरा मुलगा तुमचा कोण ?”

हंसून मोठ्यानें पेन्शनर
देतो कौशल्यानें उत्तर
"माझा नाहीं कोणी आप्त
जेवण घडतें सहवासांत
निवड आमची म्हातार्‍यांची
कधींच नाहीं चुकावयाची
तुमची प्रमिला झाली प्रौढा
शोभेल कसा म्हटलें जोडा
दोन जीव नांदोत सुखानें
प्रेरित होऊनि या इच्छेनें
घेईं तुमच्याकडे धाव मी
आळस कसला भलत्या कामीं ?
मी म्हणतों एवढी कशाला
हरकत मुलगी दाखवायला ? "
सर्वानुमतें ठरे शेवटीं
निरोप द्यावा 'बाबां' हातीं—
'ठीक येउं दे उद्यां मुलाला
नवरी मुलगी पहावयाला'

आनंदानें निघे पेन्शनर
विजयहास्य चमके तोण्डावर
लग्नें तरुणांचीं जमवावीं
गोडी वृद्धांनींच लुटावी !

संध्याकाळीं पेन्शनराला
स्वस्थपणा लाभाया कुठला ?
सात वाजल्यापासुनि येई
स्वारी अमृतभोजनालयीं
" मधुकर येऊनि गेले का हो ? "
पुसे वाढप्यां फोडुनि टाहो !
धांतलींत त्या म्हातार्‍यानें
कांदाही चावला चुकीनें !
मधू शेवटीं दिसला द्वारीं
खुणवुनि घेई जवळ सत्वरीं
कानाजवळी तोंड नेउनी
डोळे खोल मधें मिचकावुनि
बोलुं लागला; मधूस कांहीं—
उमज तयाचा पडला नाहीं !

" उद्यां सकाळीं चलावयाचें "
" कुठे ? "- बोलतो मुळीं न पुढचें !
" गीताधर्ममंडळामधें का ? "
"छे-हो ! " ( ताकाचा मग भुरका ! )
" आतां लागे सर्व मजकडे
तुम्ही शेवटीं व्हायचें पुढें ! "
अशीं बोलणीं मोघम बोलुन
मधूस सोडी तो भांवावुन
पांच रोजच्या होत्या पोळ्या
आजपरी चारावर आल्या !
मिस्किल डोळे बघुनि शेवटीं—
आली गाडी वळणावरती
नंतर मुद्रेनें गंभीर
मधू बोलला गोष्टी चार
" लग्न कशाचें घेउन बसलां ?
पत्ता नाहीं अजुनि कशाला
काल बोललों मी थट्टेत
खरेंच तें मानुनि बसलांत ? "

' बाबा ' होता महा बेरकी
मिस्किल डोळे क्षणभर झांकी
" काल बोललां जरि थट्टेत
मीहि सांगतों त्याच सुरांत
सहज बोललां-आणा नवरी
ही घ्या तुमच्यापुढें आणिली
ज्या थट्टेनें काल बोललां
त्या थट्टेतच बघण्यास चला ! "
" छे, छे, भलतें काय बोलतां ?
ऐन परीक्षा जवळी येतां
मुलगी बघण्याच्या या बाता
कशा सुचाव्या मजला आतां ?
सांगा जाउन कीं, थट्टा ती
दुसरें स्थळ घ्या आतां हातीं "
' बाबा ' अडला; पाटावरुनी
मुळीं हलेना तो जमदग्नी !
" तिथें एकदां शब्द टाकला
आतां सगळा गळा कापला—

ग्रा. क्र. ८७ ... १९६१

तरी बेहेत्तर; शब्दापुढती
लग्नाची मग काय कथा ती ?
उद्यां जरी येणार नसाल
नाहक पस्तावुनी बसाल
मुलीस घेउन मी खाकोटीं
उद्यां हिंडतों तुमच्यापाठीं !
तुमच्या पत्त्यावरी आणतों
बघूं कोण मग आतां हटतो
तरुण स्वतःला जरी म्हणवितां
मुली बघाया असे लाजतां ?
शोभा टाळायाची असेल
निमूट तर मजसवें निघाल ! ”
जीव मधूचा हो वरखालीं
कशीतरी गांठी मग खोली
‘ कुठल्या देवानें मज दिधली-
विनोदबुद्धी ही बेअकली
कानाला हा खडा यापुढें
दूर सदा ठेवीन थेरडे !

मान जरी हालवीं चुकून
अर्थ काढतिल हे त्यांतून
हाय ! काय हें दैव उलटलें
मुलगी बघणें कर्मा आलें !
नवरीमुलगी मी बघणार
काय त्यांतलें माहित डोंबल !
नमस्कार मीं तिला करावा
कीं स्मित करण्याचा देखावा ?
‘ आपण ’ किंवा ‘ तुम्ही ’ यांतलें—
कानां कुठलें लागतें बरें ?
धोतर नेसावें कीं पॅन्ट
( आहे का पण धडकी नीट ? )
हातीं घ्यावा लठ्ठ कायदा
कळेल आपोआप स्वधंदा
गावयास तिज सांगावें का
प्रसंग आला विकट नेमका !
प्रश्न मुलीला पुसण्यासाठीं
बरोबरीचा नसे सोबती

पेन्शनराच्या हातीं मान
आतां देवाजीचें स्मरण !'
जरी झोपला देव स्मरोनी
दचकत होता मधुनी मधुनी !

इकडे प्रमिलेनें ती रात्र
घालविली सारी तळमळत
'उद्यां सकाळीं येणारें स्थळ
कुणास ठाउक कसें निघेल'
जरा ऐकल्यापासुनि नांव
आला होता जिवांत जीव
नांव तरी नाहीं टाकाऊ
'मधुकर' वाटे रेशमी, मऊ
असतें भास्कर, त्र्यंबक, हरिहर–
तर मग ?-आटपला बाजार !
मनांत तिज जरि 'मोहन' प्यारें
'मधुकर' नव्हतें इतुकें खारें !
कल्पनेंत मग प्रतिमा त्याची
खटपट चाले उभारण्याची

घरांतल्या बोलण्यावरोनी
बरा असावा वाटे प्राणी !
उडे केवढा मनांत गोंधळ
कुणास ठाउक आलेलें स्थळ–
अनेकांपरी धरील वाट
कीं लग्नाची घालिल गांठ ?
अनेकजण तिज पाहुनि गेले
दरवेळीं प्रमिलेस वाटलें—
लग्नाच्या परिसीमेजवळ
पोंचुनि मागें ये पाऊल
दरवेळीं होई थरकांप
असेल ही लग्नाची खेप ?
विवाह होई याच स्थळाशीं
धरुनी चाले खूण मनाशीं
भावी आयुष्याची रेषा
मनीं आंखते भोळी आशा
अन् मग स्थळ तें गळुनी जातां
विसरुनि जावें सगळ्या चिंता

जीव रिकामा पुन्हा करावा
( दुसरें स्थळ येइ तों विसावा ! )
विचित्र ऐशा मनःस्थितींत
तिनें चिन्तिला मधुकरपन्त

दुसऱ्या दिवशीं 'मुलगा' आला
वरच्या खोलीमधेंच बसला
चाहुल त्याची लागतांक्षणीं
मुलीस झालें कसेसें मनीं

नंतर हातांमधिं ट्रे घेउन
गेली पुढती अंग चोरुन
बोलुं लागले मग पेन्शनर
दिलें तिनें पुटपुटुनी उत्तर
मुलगा होता समोर बसला
कुलूप त्याच्या परि तोंडाला !
हळूच केली मग वर मान
क्षणीं घेतलें मुलास बघुन !

तोंच जाहली दृष्टादृष्ट
तीच तयांची पहिली भेट !

# मतपरिवर्तन

" काय आपला विचार ठरला
मुलगी वाटे कशी तुम्हांला ? "
आलें धरणें; म्हाताऱ्याला—
चैन कोठलें पडावयाला !
डोकें काढुनि पुस्तकांतुनी
समोर पाही मधू चपापुनि
तों दारांत दिसे पेन्शनर—
( सैतानाची वळली नजर ! )
पुस्तक मिटुनी ठेवी दूर
बाबांना बसविलें कॉटवर
वृद्ध विचारी, " काय निकाल ?
आम्हांला तर कळून द्याल ? "
मनांत आला जरि संताप—
घसा करोनी अंमळ साफ
मधू बोलला, " निकाल कसला
प्रश्न मुळीं कोठेंच निघाला ? "

" वेड घेउनी असें बनावट
पेडगांवची धरतां वाट ?
तड लावा या प्रश्नास कशी
' हो ' कीं ' नाहीं '—चुटकीसरशी
कशास भाषा ही गुळमुळित
रोखठोक द्या झालेलें मत "
म्हाताऱ्याचा बघुनि झपाटा
मधूस पडला विचार मोठा
मनीं भावना नसे कोणती
स्पष्ट बोलण्याची परि सक्ती !
' केवळ म्हाताऱ्यास भिऊनी
नवरी मुलगी आलों बघुनी
पसंत किंवा नसे पसंत
कशास करतों मी पंचाइत
लग्न करायाचें जर नाहीं
पसंत करण्याची कां घाई ?

अवाप्ति क्र ७३४५४ ... दि: ...९७।०५...
ग्रंथांक ...१८१.९... नोंद दि ...२८।२।६१



समोर बसलेला म्हातारा
शांत करावा कसा निखारा ?
हो कीं नाहीं याविण दुसरें
उत्तर त्याला नच पटणारें'
" बोला ना-कां बसलां स्वस्थ ? "
बोले वृद्ध जरासा गर्जत !
" मुलगी आहे-तशी-चांगली "
" झालें-तर मग गोष्टच मिटली
आत्तां जाउनि म्हणतों त्यांना
मुहूर्त काढा शोधुनि नाना ! "–
म्हणत निघाले तडक पेन्शनर
पगडी चढवुनि गांठति दार
धांवत गेला मधू मागुनी
घेई बाबांना थोपवुनी
" थांबा इतुकी कसली धांदल
मला जरा बोलुन तर द्याल "
कॉटवरी बसवी नेऊन
अन् मग धरला रस्ता रोखुन !

" तुमचा कांहीं समज वेगळा
दिसतो आहे मज झालेला "
" छे, छे, माझा समज बरोबर
उगाच आतां कां माघार ?
मुलगी बघुनी आलां काल
आलों मी पुसण्यास निकाल
म्हणतां, पसंत पडली मुलगी
काय यामधें गोष्ट वावगी ? "
मधू म्हणाला, " स्थळ हें पटलें
विवाहांत परि किती अडथळे
पास जाहल्याविना परीक्षा
नको विवाहाची मज दीक्षा
तूर्त असूं द्या भिजत घोंगडें
सावकाश मग पाहुं या पुढें "
ऐकुनि यावर बाबा म्हणती
" हीच एवढी ना आपत्ती ?
त्यावर आहे छान तोडगा
पहा सुचवितों; त्यापरि वागा

आज टाकुं या लग्न ठरवुनी
सुटल्यावर मग परीक्षेंतुनी–
देऊं या उडवोनी बार
निकाल अन् लग्न हीं बरोबर ! "
निघेल कसला तरी अडथळा
टळेल हा म्हातारा बगळा
म्हणुनी काढी डोक्यामधलीं
नाना सबबींचीं भेंडोळीं
" पसंत म्हणुनी नुसतें काय
पत्रिकेपुढें काय उपाय ?
माझी नाहीं इथे पत्रिका
लग्नाचा मग कसला हेका ? "
मधूस वाटे, ' काय बहार—
बाबांना लोळविलें पार ! '
" छे, छे, त्यांची पत्रिकेपरी
वागायाची नसे तयारी
तुम्हीं आत्तां जर ' हो ' म्हटलें
पत्रिकेविणे नाहीं अडलें

आतां बोला स्पष्ट एकदां
हुंड्याचा अदमास आंकडा ! "
थिजुनी गेला मधुकर तरिही
नवी थाप मारोनी पाही !
" माझे असती पालक-आप्त
जबलपुराला जी. आय्. पीं. त
त्यांना लिहितों सर्व कहाणी
मग कळवीन तुम्हां भेटोनी "
बाबा कुठले ऐकायाला
म्हणती, " कळविन मीच त्यांजला
एक धाडतों त्यांना फोटो
सांगा पत्ता मला काय तो ! "
थाप मधूची नाहीं पचली
बाजू अंगावरती आली
" कुठवर द्यावा असा उगीच
माझ्यासाठीं दुसऱ्यां जाच ?
तुम्हीं रहावें स्वस्थ मनांत
पत्र धाडतों मीच व्यवस्थित "

असें बोलतां टळली व्याद
निघोनि जाई वृद्ध समंध

मधूस वाटे साडेसाती
पत्रिकेंत उद्‌भवली पुरती!
हात कपाळावरतीं मारी
'काय व्याप हा घेतला उरीं
सुटण्या याच्या तावडींतुन
उपाय नाहीं लग्नावांचुन!
लग्नाच्या या कठिण विचारीं
मुलगी राही अलग बिचारी
शिक्षण अथवा सौंदर्याचा
विचार नाहीं सुचत कशाचा
'लग्न' ऐकतां डोळ्यापुढती
दिसते म्हाताऱ्याची मूर्ती!
पिशाच्च एकादें लागावें
हवें तसें त्यानें करवावें
तसा हिंडतो 'बाबा' पाठीं
धरिला मज गरिबाला वेठीं!

कुठला आणूं आतां आप्त
कुणास शोधूं जबलपुरांत?
थोडी पाहुनि वाट-खुशाल
बाबा जबलपुरा जाईल
मुलगी घेउन गल्लोगल्लीं
फिरेल म्हातारी ही वल्ली!'
मना विचारी-काय करावें
उत्तर त्याला कसें सुचावें?

अभ्यासाचे झाले बारा
'लग्ना' वांचुनि कशा न थारा
हळू हळू मग वळणें घेत
मन झालें थोडेंसें शांत
विचार केला गंभीरपणें
त्यानें लग्नासंबंधानें
'आज ना उद्यां लग्न आपलें
खास व्हायचें-हें जर ठरलें
तर मग आतां हट्टच केवळ
म्हणुनी तर ना टाळाटाळ?

ही जी मुलगी काल बघितली
त्याहुनि मजला सुंदर पुतळी–
मिळणार कशी ? मी हा असला
तशीच मुलगी मिळणार मला
माझी बघतां आज लायकी
मुलगी मज अनुरूप असे कीं !
माझ्या नसती ओळखी कुठें
नसती परिचित मधुर मुखवटे
प्रमविवाहाचे मग सांधे
अशक्य माझ्या बाबतीमधें
आज ना उद्यां लग्नासाठीं
मुली पाहण्याविणे न मुक्ती
मग ही जी मीं काल पाहिली
समजा तीच जरीं पत्करली ? '

असलें होतां मतपरिवर्तन
स्मरूं लागला डोळे मिटुन
मुलगी होती किती देखणी
मनीं घोळवी सर्व बोलणीं
त्याला अंधुक जें आठवलें
वाटे आकर्षक तें सगळें !
सल्ला देणारें अधिकारें
कोणी नव्हतें वडीलधारें
तो त्याच्या नशिबाचा होता
वाटाड्या अगदींच एकटा
मनांत त्यानें खूण बांधली
अन् प्रमिलेला पसंत केली !
' नशीब माझें जरी शिकंदर
होइल हाही विवाह सुखकर '
तोंच मनीं ये असा विचार—
' खरेंच मज ती पत्करणार ?
आपण शिक्कामोर्तब केलें
मुलगा पाहुनि जरी निराळें—
मुलीस वाटे ? तर मग अवचित
म्हणेल ती ' मज हा न पसंत '
विचार सुचतां मधूस वाटे
लग्नांत किती भरले कांटे !

पेन्शनराला हें सांगावें–
'भलत्या मोहास न गुंतावें
मुलीस माझी सर्व हकीकत
करून द्यावी आधीं माहित
घरची माया नसे फारशी
नको पडाया नंतरीं फशीं
मुळीं नसावा कसला कावा
हा मी असला आहें-ठरवा
'पसंत-पसंत' करिती नाना
मुलीस स्पष्ट विचारुनि घ्या ना!
मुलगी म्हणतां 'हो'याउप्पर
मीही चढतों बोहल्यावर–'
स्मित तोंडावर नंतर झळके
डोक्याचें हो ओझें हलकें

चवथ्या दिवशीं बाबा आले
'जबलपुराहुनि कांहीं कळलें?'
अभ्यासाविण चार दिवस ते
लाम्बले किती मधूच्या मतें!

'जबलपुराऐवजीं जवळचें
नांव न सुचलें मजला शिंचें!
कऱ्हाड अथवा मिरज, सांगली
मुंब्रा, भांडुप वा बोरिवली
असतें जर मीं दिलें दडपुनी
उत्तरास मग इतुकें थांबुनि–
'हो' म्हणण्याला कशा विलम्ब
उगाच नसती थांबाथांब?'
लग्न टाळणारा हा मधुकर
झाला होता किती अधीर
बाबा दिसतां दूर लाम्बवर
सज्ज स्वागता हा दारावर
भूतकाळच्या शिव्या संपुनी
आदरभाव दाटला लोचनीं
पूर्वींचें म्हातारें भूत
आज वाटलें ईश्वरप्रेषित!
गादीचा बनवोनी लोड
बसवी मग वृद्धाचें खोड

## तो आणिक ती

मुखीं आणुनी नाटकी हंसें
'चहा हवा का?' अगत्यें पुसे!
"आलें जबलपुराहुनि पत्र
पसंत पडलें स्थळ सर्वत्र"
जरा लाजुनी मधू बोलतो
घसा खांकरुनि मधें खोकतो!
बाह्या सारुनियां मग वरती
बाबा कागद घेउनि बसती
"तर मग आतां पुढचा बेत
ठरवायाला घालूं हात
मानपान अन् हुंडा यांची
यादी केव्हां करावयाची?
लग्न व्हायचें जबलपुराला
कीं मी ठरवूं मांडववाला?
मुहूर्त थोडे वैशाखांत
उरकुनि घेऊं त्याच्या आंत!
आधीं तुम्हां नव्हतें म्हटलें
प्रमिला माणिक असे झांकलें

सहज वाटलें हें जुळवावें
मीं म्हटलें तें कसें न व्हावें?
चला पंत, मी करतों गाडी
जाऊं आपण सासुरवाडीं!"

बाबांचें वय जरी एवढें
कंटाळ्याचें तरी वावडें
निरोप नानांकडुनी घेउनि
मधूस देती रोज नेउनी
अन् मग त्याचें उत्तर त्यावर
उलट पोचवी हा पेन्शनर
चर्चा, खलवत सगळें झालें
"लग्न एकदां आहे ठरलें
मग तें झालेलेंच चांगलें"
—सार शेवटीं निघे त्यांतलें!
"जरी परीक्षा आली जवळी
लग्नाला परि अडचण कसली?
मुलगी माहेरीं राहील
अभ्यासाला 'खो' न बसेल"

असें सांगुनी गेले नाना
मधूस मग 'नाहीं' म्हणवेना !
परीक्षेवरी सुचे उपाय
(लग्नापुढतीं त्याचें काय ?)
परीक्षा पुन्हा पुढल्या वर्षीं
प्रमिलेची परि खात्री कसची ?
मनांत ठरलें मग शेवटचें
कीं यंदाचें 'ड्रॉप' घ्यायचें !
असें ठरवुनी अभ्यासबुकें
उंच फळीवरतीं तो फेंके !
सकाळसंध्याकाळ मजेंत
मधू हिंडतो मग गांवांत
रस्त्यांमधुनी टाकित फेरी
मुलींकडे बघते ही स्वारी !
चक्कर मारी कॉलेजांत
पडेल का प्रमिलेची गांठ ?
संध्याकाळीं हिंडायाला
जात असेल कुठे ही प्रमिला ?

अशाच एका संध्याकाळीं
एकटाच अंधाऱ्या वेळीं
सडक सोडुनी जरा हातभर
असाच बसला हिरवळीवर
दूर चालल्या कडेकडेनें
मुली कोणशा द्रुत वेगानें
उशीर झाल्याची जाणीव
होउन चाले धावाधाव
जवळुनि गेल्या त्याच्यापुढुनी
तोंच चमकलें त्याच्या नयनीं—
तेज केवढें !– कारण त्याला
दिसली होती त्याची प्रमिला !
हळूच उठला आणि मागुन
चाले अंतर जरा ठेउन
बंगल्यांत शिरली मैत्रीण
दुवा देइ तिज मनापासुन !
झपझप चाले प्रमिला वेगें
मधुकर तरिही मागें मागें

गेला वेळ तसा मग थोडा
मध्यास आला खोकला बडा!
चमकुनि प्रमिला मागें पाहे
कोण मवाली मागें आहे
झाली कोण तिची मग धांदल
वेग वाढवी ताशीं मैल!
तरुण मवाली खमंग मोठा
तोही अंतर तोडित होता!
बाह्य धिटाई दावुनि खोटी
उभी राहिली जाग्यावरती
वाटे—ओशाळुनी मवाली
वळेल मागें त्याच पावलीं
तरुण केवढा हा निर्लज्ज
तिच्यापुढें येउन हो सज्ज!
"काय एवढी कसली घाई
धाप लागली तुमच्यापायीं!"
शब्द ऐकुनी प्रमिला धीट
तिला वाटलें आली झीट!

नंतर भानावरी येउनी
हळूच बोले लाजलाजुनी
"इथें कशाला असें गांठलें?
म्हणे काय जर कुणीं पाहिलें?"
"ठीक तरी; मी जातों निघुनी"
लटकें बोले पाय उचलुनी
"थांबा-पळविल मला भामटा
कुठल्या मग लग्नाच्या बाता?"
तिचें ऐकुनी हास्य मोकळें
पाय मध्याचे जागीं खिळले
चालति अस्फुट अंधारांत
सहवासाच्या प्रथम सुखांत
अशा मोकळ्या एकांतांत
दोन मनांची जुळली संगत
हळूहळू संकोच निवळला
दोघांचा दिल जाहला खुला
"इंद्रलोकचा न मला मगदुर
साधा कपडा-साधी भाकर

हींच सुखें माझ्या भाग्यांत
समाधान तुम्हांला यांत ? ''
ऐकुनि प्रमिला म्हणे शेवटीं
" मजला असती मान्य या अटी
तुम्हीच थोडा करा विचार
माहित ना मी कसली पोर
तुम्हांला हवी साधी भाकर
परि मी बनवीं काळीठिक्कर !
मनामधें जरि म्हणाल, ' तरुणी-
आली कॉलेजांतुनि शिकुनी
संसार असा दिसेल माझा
ती राणी अन् मी जणुं राजा ! '
आधीं सांगुनि पहा ठेवतें
रचूं नका मनिं डोंगर भलते ! "
" फार चांगलें; दोघें आपण
व्यवहारांत असूं अनभिज्ञ
ठायीं ठायीं ठेंचा खात
प्रगतीच्या नवथर आशेंत
परस्परांच्या आधारानें
जाऊं अनोळखी वाटेनें
ठरवुनि हा लग्नाचा योग—
करून पाहूं नवा प्रयोग ! "
चंद्रकोर साक्षीला ठेउन
जीवनज्योती जुळल्या दोन

दोघांच्याही ग्रंथांमधलें
पान नवें कोरें उलगडलें

# पुढचे बेत

लग्न होउनी महिना झाला
राग मधूला कितिदां आला
'कशास केलें लग्न? अजून–
सुटका नाहीं पुस्तकांतुन
'ड्रॉप' घेतलें उगा कशास?
परीक्षेस अजुनी अवकाश
तोंवर मी अन् माझी खोली
प्रमिलेची मज संगत कुठली?'
पुस्तक उघडुनि बसे कितिकदां
डोक्यामध्यें परि न कायदा
समोर नाचे ओळींमधुनी
प्रमिलेची प्रतिमाच हटकुनी!
'आज म्हणे येईन दुपारीं
घड्याळ-कांटे पांचावर जरि—
पत्ता नाहीं; आल्यावरती—
अशी काढतों मग कंबक्ती!'

हळूच कोठें चाहुल कळतां
अधीर डोळे गांठति रस्ता
प्रमिला नाहीं असें पाहुनी–
परतुनि येती बापुडवाणी!
दूर दिलें मग पुस्तक फेकुन
'हेंच कपाळीं विवाहजीवन
लग्न जाहलें; चुके न खास —
मुशाफिराचा परि वनवास!'
रागावुनि सिगरेट काढली
काडीही जोरांत ओढली—
तोंच विझविली! आठवलें 'मी–
उरलों नाहीं माझा स्वामी!'
लग्नगांठ पडतांच जाहला
स्वतंत्रतेवर प्रहार पहिला
प्रमिला जुलमी जणुं सम्राज्ञी
सिगारेटला केली बंदी

प्रेमभरानें जरा पाहुन
सिगारेट मग दे फेकून !

खोलीवरुनी या महिन्यांत
फिरला होता स्त्रीचा हात
टेबल सगळें साफ जाहलें
खिडक्यांना पडदेहि मिळाले
प्रमिलेच्या डोळ्यांस बोचली
'गार्बो'ची प्रतिमाहि बिचारी
तिच्याऐवजीं मग डौलांत —
छबी स्वतःची ठेवी तेथ
सिगारेटची गेली राख
दिसे बांगडी फुटकी एक !
त्यानें जों उचलावें पुस्तक
तोंच कधीं पाहतो अचानक —
पॅडवरी कुणितरी खरडल्या
ओळी – रेघोट्याही कसल्या !
खिशांत केव्हां हात घालतां —
लागे चुरगळलेला कपटा
सुकलेल्या पाकळ्या नि वेणी
तिनें ठेविली केव्हां भरुनी !
लिहावयाचें म्हणुनी पाही
'पेन' सांपडे परि न कुठेंही
खात्री तोंच मनाची होत
पेन धरी प्रमिलेची संगत !
मनांत म्हणतो 'नशीब खास
स्त्रियांस नलगे पुरुषी वेष
नाहींतर मग शर्ट धोतर —
मजसाठीं कुठुनी टिकणार ?
बाईसाहेबांच्या हातुन —
उरेल त्यावर माझी गुजरण !
विवाहितांच्या सर्व अडचणी
त्यांत मला भरपूर वांटणी !
विवाहितां जीं सौख्यें लाभत
त्यापुरता परि मी अविवाहित !
आज एकदाचा शेवटचा
निकाल लावुनि टाकायाचा

एक बायको वा अभ्यास
दोघांचें पटणार न खास!'

मधूस वाटे 'द्यावें सोडुन
कायमचें हें विद्यार्थीपण
नको परीक्षा नको कायदा
काय शिकोनी असे फायदा?
एकलेपणाचा कंटाळा
खोलीला ठोकावा टाळा
प्रमिलेला सांगावें स्पष्ट
माहेर पुरे-बिऱ्हाड थाट!
रस्त्यामधुनी मज दिसतात
किती जोडपीं स्वर्गसुखांत
पत्नीच्या हातीं शिंकाळें
किसणी अथवा ताकघुसळणें
नवऱ्याच्या हातांतहि झोळी
भाजीनें दिसते भरलेली
घराकडे वळवीत पावलें
दोन जीव ते किती रंगले

नाहींतर मी फटिंग ध्यान
आणि म्हणे कीं झालें लग्न!
जोंवर होतों मी अविवाहित—
होतों या त्रासांतुन मुक्त
मी अन् माझी खोली याविण
धावलें न मोकाट कधीं मन
लग्न जाहल्यापासुनि मात्र–
प्रमिलाच दिसे मज सर्वत्र!
पुढें ठेविला पुस्तकभारा
मी ओझ्याचा बैल हा खरा!
धड नाहीं एकटा भूवरी
धड नाहीं मी परि संसारीं
विवाह केला-झालें काय?
तर गाढोला फुटले पाय!
प्रमिला?- ती माहेरीं दूर
अस्मादिक हे पुन्हा फकीर!
छे-छे-तरुणांच्या हालांना!
कांहीं सीमा ही आहे ना!

सांगणार तिज निक्षुन आतां
अभ्यासावर आज अक्षता!'

प्रमिला आली; हळूच दारीं—
उभी राहिली मूर्ती हसरी
तरी मध्याची उदासवाणी—
चर्या येईना उमलोनी
"उशीर झाला म्हणुनि राग हा ?
घड्याळ माझें बंद हें पहा
बघा-वाजले अवघे चार
आलें ना मग मी वेळेवर?"
हसऱ्या प्रमिलेला जणुं उत्तर
म्हणुनि दृष्टि लावी गंभीर
"दूर जाउं चल हिंडायास
जीव कसा हो कासावीस"
खिन्नपणा झटकाया दूर
दोघें पडलीं मग बाहेर
प्रमिला ऐकुनि घेई सर्व
त्याच्या तक्रारींचें पर्व

मनीं सांचला होता मोठा
सुप्त भावनांचा जो सांठा—
सर्व मोकळेपणें ओतिला—
तिच्यापुढें; तो बोले, "प्रमिला—
सहवासाची भूक यापुढें
वाढे; तुटतें आंत आंतडें
तूं असतांना माझ्याजवळ
विसरुनि जातों काळ नि वेळ
होतां परि तूं डोळ्यांआड
तुझेंच लागे हृदया वेड
ज्यावर दृष्टी पडे त्यांतुनी
तुझ्या स्मृतीचा उठे प्रतिध्वनि
तुजविण नाहीं चैन मनाला
फसवणूक ही हवी कशाला?
अभ्यासांत न यावें विघ्न
माहेरीं राहिलीस म्हणुन
तुझ्याविणें एकटा कधींही
परीक्षेंतुनी सुटणें नाहीं

विटलों पुरता-नको यातना
पहा सांगुनी तूं नानांना—
एका गांवामध्यें असुनी
अशक्य ही वेगळी राहणी!"
असें बोलुनी लावी मधुकर
प्रमिलेच्या नजरेला नजर
मुद्रा होती शांत किती ती
होई डोळ्यांची नच तृप्ती
हृदयाची ही घालुनि साद
थांबे ऐकाया पडसाद
प्रमिलेनें पाहिलें शेवटीं
त्याच्यावरतीं रोखुनि दृष्टी
दिसतां प्रेमळ भाव, त्याजला–
मना किती आधार वाटला
"म्हणतां तें सगळें मज पटतें
ओढ मना माझ्याहि लागते
परस्परांचे धरले पाय–
दूर राहण्यासाठीं काय?

विटलां तुम्ही असुनी पुरुष
मी तर केवळ बाईमाणुस
तुम्हां नाहीं पुरला धीर
असणार किती मी खंबीर?
वियोगदुःखें होरपळून
मीहि काढतें मोजुनि हे क्षण
जरी खरें हें–प्रश्न स्वतःला
कधीं विचारुनि तुम्हीं पाहिला?
मधेंच गाळुनियां अवसान
काय बरें निघणार तयांतुन?
अभ्यासावर मारुनि लाथ–
जरी राहिलों सहवासांत
सौख्याच्या मोहानें क्षणिक
आयुष्याची होइल राख
धीर धरोनी थोडा काळ
यत्न भगीरथ जरी कराल
समोर ध्येयें जीं ठेवाल—
शिखर तयांचें मग गांठाल

थोड्या दिवसांच्या कष्टान्तीं
दिसतिल नेत्रां माणिकमोतीं
उत्कर्षाच्या उंच पायऱ्या
द्रुतवेगानें चढाल साऱ्या
यशोमंदिराच्या शिखरावर
दिसेल तुमची मूर्ति मनोहर
विरहाची आतांची तळमळ
दिसेल मग इवलीशी पोकळ
वकील जरि नामांकित व्हाल
येतिल आशिलांमागुन अशिलं
तुम्हां मग कोर्टाची घाई
मी तर मोठी वकिलिणबाई!
तुमच्या भाग्याचा शेजार
मिळे निकटचा मला जन्मभर
पहा-भाग्य हें तुमच्या हातीं
जरा कष्ट करण्याची खोटी
विरहाची ही प्रेमळ खंत
वहावयाला नसे उसंत

लागा पुढल्या मार्गी वेगें
मी आहें कीं तुमच्यासंगें!
तुमच्या बुद्धीच्या तेजांत
करा सर्व जगताला स्तिमित
लावुनि या स्वप्नावर डोळे
दिवस कंठतें मी हे सगळे!"
इतुकें बोलुनि थांबे प्रमिला
नजर भिडवुनी आकाशाला
फलकावरतीं जणूं त्या निळ्या
स्वप्नछटा खुललेल्या दिसल्या
"खरेंच तुजला वाटतें असें?
मला जीवनीं कधीं अल्पसें
ध्येय गांठतां येइल काय?"
मानेनें ती म्हणते, "होय"
मधूस वाटे क्षणांत सगळी
दुर्बलता कोठेंच पळाली
ऐकुनि धीराचे ते शब्द
मनीं दाटली नवी उमेद

'सुखदुःखाच्या गोष्टींसाठीं
आज भेटला खरा सोबती
भूतलावरी असे जीव हा
ज्याचा मजवर विश्वास महा .
माझ्या कर्तबगारीसाठीं
नेत्र जयाचे आतुर होती
माझ्या क्षुल्लक विजयाचा कण
व्यापिल ज्याचे पंचप्राण
माझ्या भाग्यासाठीं केवळ
बसेल घेउनि जो जपमाळ
माझ्या दुर्दैवाचे घाव
ज्या हृदयाचा घेतिल ठाव
असे जीव हा ज्याच्यापुढतीं
'मी' त्वाची मज पडे विस्मृती'
चमकूं लागे मग नयनांत
उत्साहाची नवीन ज्योत
मनांतला बारका कोपरा
खिन्नपणा ना तिथेंहि थारा

दोघेंही येउनि रंगांत
सर्व ठरविती पुढचे बेत
"खास व्हायचे तुम्ही वकील
(असा पहा अभ्यास कराल!)
मीही यापुढल्या वर्षास
होउन घेतें बी. ए. पास
वकील तुम्ही-जा कोर्टात
दंग मी परी संसारांत
तुमच्या संसाराची चिंता—
हाच विसावा माझ्या पुरता!"
"छे.छे-वेडे-बी.-ए. तरुणी
अशीच राही घरांत बसुनी?"
"म्हणजे?—बी. ए. झाल्यानंतर—
नको मला माझा संसार?
साफ सांगतें कीं मी शिकुनी
पत्करीन ना कसल्या गोणी
म्हणाल 'घरकोंबडी' चिडवुन
तरी घरांतच बसुनी राहिन"

“बरें बरें हो वकिलिणबाई
घरांत बसुनी घ्या अंगाई
हवा न यावी मुळिं बाहेरुन
म्हणुन हवीं तर दारें लाविन !
वकील येतां बरोबरीचे—
दर्शन त्यांनाही न व्हायचें
म्हणेन बंधन नव्या व्रताचें-
तोंड न बघणें परपुरुषाचें !”
“पुरे करा ही वात्रट थट्टा
स्वभाव मिस्किल ठाउक पुरता
उशीर झाला घरीं निघाया
पोलिस येतिल मज शोधाया
चला उठा-खोलीवर जाउनि
बसा पुस्तकें सर्व उघडुनी !”
“कबूल; एका अटीवर मला
येशिल जरि तूं रोज चारला”
“बघेन पुढती ; शपथ घेउनी
गळा कशा घेऊं गुंतवुनी ?”
हंसुनी दोघें मोकळेपणें
आक्रमिती मग मार्ग आपुले



# विऱ्हाड थाटलें!

सुखस्वप्नें हीं समोर ठेउन
दिवस कंठिती तीं दोघंजण
एकाला जरि वाटे शीण
दुजा भेटतां जाई विसरुन
नीरस जरि अभ्यास वाटला
डोळ्यापुढती विचार पहिला—
'केवळ माझ्या प्रमिलेसाठीं
दिव्य हवें तें करीन जगतीं
इतुक्या हालअपेष्टा पुढती
ताट सुखाचें पडेल हातीं'
प्रेमाची ही ओढ विलक्षण
सुखकर बनवी दुःखाचे क्षण!
दिवसभरी आलेला थकवा
तिच्या दर्शनें मग विसरावा
जों जों जास्त करावे कष्ट
अभ्यासाचे डोंगर फस्त—

तों तों वाटे प्रमिलाराणी
अभिमानानें जाइल फुलुनी
'पहा कसा माझा हा वल्लभ
तेजानें जणुं चमके कौस्तुभ
प्रिये, प्रिये सारखें म्हणोनी
नाहीं बसला बाइल होउनि
माझ्यामागें हिंडतो कुठें
पहा चालला त्याच्या वाटे
पराक्रमी पुरुषाची छाती
तिचा कोट हा माझ्या भंवतीं'
सर्वांना सांगेल कौतुकें
त्यापुढती मग कष्ट हे फिके!

पराक्रमाचा केला कळस
आणि परीक्षा झाला पास!
तिनें दिला हातीं जो पेढा
खातांना आनंद केवढा!

गोड घोळतो मुखांत घास
भाग्याचा हा सूचक खास
त्या महिन्यांत रजा खोलीला
दुसरी जागा बघूं लागला
'जागा देणें आहे' पाट्या
डोळ्यापुढती नाचत होत्या !
'आतां संसाराचा गाडा
सुरू जाहला-प्रथम हा धडा
मुशाफिराच्या या संसारीं
केरसुणीपासून तयारी !
आठवे तशी करतो यादी
नातरि राहिल गोष्टहि साधी'
म्हणे तिला "हें बघ ए, ऐक
मला एकदां सांगुन टाक
हवी केवढी जागा तुजला ?
टिळकरोडवर बघूं बंगला ?"
प्रमिला बोले लटक्या रागें
हसूं ओघळूं गालीं लागे

"आहां आपण फार शहाणे
खिशांत मोजा आधीं नाणें !
बंगल्यांत राहून खायला
पैसा आणायाचा कुठला ?
दोन तीन खोल्या स्वस्तांत
जवळ पहा कोठें मिळतात."
"हिंडण्यांत मी नाहीं मतलब
तुझा पाहिजे शिक्कामोर्तब
तूं आणिक मी सांजसकाळ
जागा शोधूं, रानोमाळ !"
"असा कुणीं संसार मांडिला ?
तुम्ही पहा अन् मान्य तुम्हांला-
जागा, न्या मग दुसऱ्या दिवशीं
गृहिणीला; जनरीत ही अशी !"
"माझी गृहिणी मुलुखवेगळी
रीतभात माहीत ना मुळीं
ती नवऱ्याचें बोट धरोनी
खुशाल जाते रस्त्यामधुनी !"

म्हणत तिला ओढी बाहेर–
जागा करण्याकरितां मुक्र

जागा पाहुनि दिवसाकांठीं
तपासणी मग उलटीसुलटी
जागेसाठीं सभा परिषदा–
हाच होउनी, बसला धंदा!
तिनें म्हणावें 'जागा कोंदट,
स्वयंपाकघर आहे धुरकट'
कधीं दिसावी जागा छान
वाट मागच्या परि बोळांतुन!
कधीं मिळावा घरामधें नळ–
हॉल परी संडासाजवळ!
ओल दिसावी कोठेंकोठें
कुणी दाखवि रिकामे गोठे!
त्यानें बोलावें "ही देवी
असल्या जागीं कैसी न्यावी?"
तिनें म्हणावें "तुमची देवी
विस्तवामुळें दिसेल भगवी
देवीचा अवतार हा नवा
नळावरी ती घासते तवा!
खोलीमधुनी 'नळबाजारां'
देवीच्या मग खेपा सतरा!
कुठले देवीला देव्हारे
तिच्या पडे हातीं पोतेरें!"
तिनें शेवटीं पसंत केली
जागा जरि थोडी अंधारी—
भाडें अवघें होतें सोळा
तेवढ्यांत नळ मिळे वेगळा!

पहिलें भाडें मधू मोजतां
गोंधळला तो मनांत पुरता
'आजवरी मीं जें ज केलें
सर्व एकट्यासाठीं झालें
दुसऱ्याचे ते हितसंबंध
कशास त्याचा मज धरबंध?
खिशांतली पै अन् पै सगळी
केवळ माझ्यासाठीं झिजली

जें जें माझें-अंश त्यांतला
दुसऱ्यासाठीं कधीं न उरला
आज उगवला पहिला दिवस
भागीदार मिळे जोडीस
जें माझें तें सर्व न माझें
अर्धें परि दुसऱ्याचें ओझें
मना, तुझें बेताल वर्तन
त्यावर आलें बाह्यनियंत्रण !
माझा नाहीं मी स्वाधीन
आतां झालों दुसऱ्याचें धन
अशीच देवा, या जुलुमाची
सदैव लाभो प्रेमळ कैची '

संसाराचीं भांडींकुंडीं
त्यांच्या दिसती या उतरंडी
भांडीं, ताटें अन् पातेल्या
ह्या नानांच्या माळ्यावरल्या
त्याच्या हातीं दिसे खराटा
ती शोधी पाटावरवंटा !

खिळे ठोकुनी जागोजाग
लावी कॅलेंडर, पंचांग
नळावरी जाऊन बादली
त्यानें पहिली भरुनि आणली
पळी, उलथनें, कढई, चिमटा
यांच्या जागा ठरवि एकटा !
कमरेवर ठेवुनियां हात
उभी राहिली प्रमिला स्वस्थ !
"पुरुष तुम्ही-कां उगाच आतां
सैपाकघरांत या लुडबुडतां ?
बसाल सगळा करुनी गोंधळ
उडेल माझी मग तारांबळ
सजवा तुम्ही तुमचा हॉल
प्रकाश तुमचा तिथें पडेल
इथली आहें मी मुखत्यारिण
मला नको तुमची भुणभूण
हातीं जी येईल ती पुडी
करूं नका त्या डब्यांत उपडी !

साखर म्हणुनी मीठ भराल
चला उठा; उचला पाऊल"
"वा; मी झालों वकील आतां
बिऱ्हाड नाहीं येत लावतां ?
बैस स्वस्थ तूं या चटईवर
पहा कसें लावतों सर्व घर
स्टोव्ह, बाटली आणि काकडा—
स्वतंत्र त्यांना हा कोनाडा !
इथें ठेवली मंडई-वही
काय हवें तें लिही प्रत्यहीं
दूध कढत उतरांया खालीं
फडकें चुलखंडा शेजारीं !
तुळईचें हें आलें टोक—
रांगोळें अडकवुनी टाक !
देव दिले नानांनीं सात
तूर्त ठेव ते फडताळांत !
गुंडाळुनि सोवळें एकदां
चिकटव त्यांना गंध अक्षता !

पुडे सोडुनी कागद दोरा
साठवून ठेवावा सारा
वर्षभरी चालव हा खाक्या–
रद्दीच्या मग मिळतिल दिडक्या !'
चाले त्याची असली घाई
तिजला पुरतें बोलुं न देई
दिवसभरी केली राबोनी
संसाराची मग उभारणी
ऐटीनें पसरोनी चटई
बसती तीवरती दोघेंही
तोंच निघे डोक्यांत कल्पना
म्हणतो, "प्रमिले, स्टोव्ह काढ ना !
असा बनवितों चहा फक्कड
मिळणार न ज्या जगांत तोड"
कसातरी शेवटीं बनविला—
प्रथम चहा संसारामधला
जरी सांडला चहांत चोथा–
अमृतापरी भासत होता !

संसाराचे महिने पहिले
चुटकीसरसे सम्पुन गेले
उठुनी उरकावी दोघांनीं
कामाची आपली वांटणी
तिच्याकडे कंत्राट चहाचें
आणि उरकणें सैपाकाचें
धोबी, वाणी, हिशेब, दुमतें
मधूकडे सोपविलें खातें!
मंडईस तो जाई लाम्ब
तापवितो पाण्याचा बम्ब!
शेगडींत घालून निखारा
प्रमिला मांडी तिथें पसारा–
अभ्यासाचा; उठे वाचतां
पाही कढ आला का भाता!
जेवण तर रोजचें दहाला
(उशीर होइल ना कोर्टाला!)
सैंपाकाची घाई इकडे–
नजर अर्धवट पुस्तकाकडे

दहा वाजतां मधू झटापट
दोन मांडुनी घेई पाट
वाट्या ताटें स्वच्छ पुसोनी
मीठहि घेई तो वाढोनी
प्रमिला जागीं बसल्या बसल्या
घेई उकरुनि भात-बुटकुल्या
दोघांनीं मग हंसत खिदळतां
जेवावें गप्पांत रंगतां
मधुकर जाई मग कोर्टांत
आणि 'वकीलिण' कॉलेजांत
कुलूप जागेला लटकावुन
(किल्ल्या केल्या होत्या दोन)
मार्ग वेगळा फुटे तोंवर
जाती रस्त्यांतून बरोबर
अखेरच्या येतां वळणास
दुरावती मग कांहीं तास

संध्याकाळीं आढळतात
पुन्हा पाखरें तीं घरट्यांत

तो सांगे कोर्टाच्या गमती—
हंसे किती ती; त्यास न गणती
खटल्यामधलीं तत्त्वें कूट—
साक्षी होती कशा बनावट
अबलांची दारुण रडगाणीं
कफल्लकांची कर्मकहाणी
दिसणारें हें कोर्टापुढलें
नग्न प्रदर्शन-सांगे सगळें
लांब, उभंटे मुडपुनि कागद
खाकेमध्यें ठेवी अलगद
प्रमिला म्हणतां "आले कोठुन ?"
हंसुनी म्हणतो, "आहे प्रकरण" !
"प्रकरण कसलें ?" विचारतां ती-
मुद्रा करतो गंभीर किती
म्हणे, "तुला ही नसे माहिती-
वकिलाची भाषासंपत्ती ?
नवीन शिकलों शब्द कितीक
त्यांतिल थोडे तूंही शीक !

जबाब कबुली अन् दरखास्त
यांचा गोंधळ अजुन मनांत !
'पुर्सिस' म्हणजे काय नेमकें-
सांगणार नाहींत पुस्तकें !
अवलजप्ती, हुकूमनामा
किती सांगणें यांचा महिमा !
बोले काय शिरस्तेदार
नकळे मजला एकहि अक्षर !
कारकून वकिलाचा देव-
त्याच्या पुढती आम्ही गाढव !
असतो मुद्दा बारका किती—
त्याचीं हीं 'प्रकरणें' माजती
दोन तीन महिन्यांच्या आंत—
शब्द सर्व हे होतिल पाठ !"

तीहि सांगते कॉलेजांत
झाली कसली गंमतजंमत
'ध्यान' पाहतां वर्गीत नवें
घुमूं लागले कसे पारवे !

नांव ‘पुराणिक’ कळतांच कसा—
पुढें ठेविला तांदुळ-पैसा !
कशी अचानक मुलींच्यापुढें
फटाकड्याची माळ कडाडे !
गांवामधला वक्ता कुठला
अक्षर न दिलें बोलुन ज्याला
मुली भांडतां आज आपल्या—
झिंज्या उपटायास लागल्या !
अविवाहित अध्यापक कोण
मुलींकडे पाहतो रोखुन !
मुलांपुढें कोणाची दुरदुर
घरीं बायकोपुढती मांजर !

कोण घालतो विटका, मळकट
अनेक वर्षें एकच कोट !
मुलींस आलीं कशीं नवनवीं—
पत्रें घाणेरडीं निनांवी !

सुखदुःखाची अशी शिदोरी
रोजची नवी तिची माधुरी
दिवसभरीचा सगळा शीण
परिस हा; बने तेंहि सुवर्ण !
यक्षकिन्नरांना वाटावा
त्यांच्या स्वर्गसुखाचा हेवा
परस्परांवर ठेवुनि भाव-
नांदत होते प्रेमळ जीव.

# त्याची वकिली

बोलबोलतां केव्हां नकळे
दिवस परीक्षेचेहि ठेपले
घरकामाच्या खस्ता नाना
अभ्यासा तिज वेळ पुरेना
कुतरओढ चालली; अशानें–
करूं लागली रोज जाग्रणें
मधुनी मधुनी देत जांभया
वाची टिपणें, पुस्तकें, वह्या
डोळे आपोआप मिटावे
पुस्तक उघडें तसें रहावें
दचकुनि जागें मधेंच व्हावें
अभ्यासास पुन्हा लागावें
प्रमिलेचे हे बघुनी हाल
जीव होतसे त्याचा व्याकुळ
म्हणे तिज, "नको घेऊं कष्ट
वळूं नको स्वयपाकघरांत
घरकामाची जबाबदारी
सोडुनि दे आतां तूं सारी"
प्रमिला यावर म्हणे मधूला
"अंगावर हा येइल सल्ला
करतां केवळ मी अभ्यास
जेवण घाली कोण तुम्हांस?"
"त्याचा कसला इतुका बाऊ
खाणावळिचा डबा मागवूं!
शहरांत अशी असुनी सोय
तब्बेतीची कशास हयगय?"
"असा काय रोजचा उकाडा
तर वाटावा त्रास एवढा?
दोघें आपण; बोलबोलतां—
भात शिजे, नकळेही पुरता!
नको डबा; शीः-अन्न कसें तें
घशांत सगळें जसें अडकतें!"

अनुक्रम ५३५०५४ दि: ...
१९११ नों: दि: २६।२।७१
१९११



"डबा नको? मग महिने कांहीं-
सैपाकाला पाहूं बाई!"
"जेवाया माणसें अफाट
म्हणून कां बाईचा घाट?
नैवेद्यापुरता सैपाक
बाई घेइल बारा नाहक"
"प्रश्न थोडक्यासाठीं सारा
प्रकृतिचे वाजतील बारा!
व्यर्थ कशा ही ओढाताण?
बसशिल घालुन उद्यां अंथरुण!"
"छे-छे; ठरलें; तुमचें कांहीं
अक्षर मी ऐकणार नाहीं!"
ऐकुनि निर्वाणीचे बोल
बोलणार मग काय वकील?

प्रमिला मोठी चतुर धोरणी
परिस्थिती होती जाणोनी
तिची चालली खरीच ओढ
त्यास काय परि दुसरी तोड?

डबा आणि सैपाकिणबाई
प्रश्न तिथें दिडक्यांचा येई!
गांवाकडला वसूल थोडा
त्यावर संसाराचा गाडा
वकील जाई जरि कोर्टांत
खिशांत नव्हता छदाम येत!
कॉलेजाची फी देतांना
तिजला होती किती यातना
'माझ्या शिक्षणहौशीसाठीं
खर्च चालला व्यर्थ हा किती
याच कदाचित शिक्षणद्वारा—
मिळेल संसारास आसरा?
नातर केवळ डिग्रीसाठीं
चाले पैशाची ही माती'
पाहिलें नवें तें तें घ्यावें
लाडिक हट्ट धरोनि बसावें
अल्लड नवनवरीची वृत्ती
तिच्यांत आतां उरली नव्हती

# तो आणिक ती

हट्ट कुणाजवळी घेणार ?
तीच तिची होती मुखत्यार
सरलें पुरलें सगळें बघणें
आजचें उद्यां-पुढें ढकलणें
पिशवीची पाहून पोकळी
'हवें-नको' ची यादी सगळी
संसाराचीं छिद्रें दोन—
अन्नें ठेवणें लपवुन
याची होती जबाबदारी
तिच्या एकटीवरती सारी
सगळें हें दिसतां डोळ्यांस—
मन कचरे भलत्या खर्चास
मधुकर निष्काळजी; त्याजला
ठाउक नव्हता असा मामला !
'आज खर्चिली व्यर्थ आणेली'
जीव न होई कधि वरखालीं
प्रमिलेपुढती नव्हती वाटत
पैशाची कसलीहि मुर्वत

शिल्लक आहे आज खिशांत
करुं या तिजसाठीं खैरात
"आवडलें हें पातळ ? बोल
सुरेख शोभुन तुला दिसेल
घड्याळ हें घेऊं तुजसाठीं
कीं नक्षीची हवी आंगठी ?"
स्वभाव त्याचा होता माहित
ती घेई आखडता हात
हळूच मग बदलोनी विषय—
प्रमिला तिथुनी काढी पाय

कधीं न चुकवायाचें कोर्ट
नियम ठरविला पहिला सक्त
चढवोनी साहेबी साज
कोर्टामध्यें जाई रोज
या कोर्टातुन त्या कोर्टांत
उगाच बसतो नुसता भटकत !
कागद जवळ सदा बाळगतो
खटल्यांचे आधार शोधितो

मधेंच पाही घालुनि खेट
कोर्ट येउनी बसलें का तें!
ऐके सगळे साक्षपुरावे
जणुं याचे हे सर्वची दावे!
उमेदवारी करुनि शेवटीं
कंटाळुनि बाररूम गांठी!
तिथें मोकळी ईझीचेअर–
दिसतां झोकी अंग तिच्यावर
खुर्च्या या ओळींत मांडल्या
पहुडतात वकिलांच्या स्वाऱ्या
धंद्यामधले तास रिकामे
घालविती येथें आरामें
मधूसारखे अशीलहीन
वकील तेथे कितीक दीन
धरून आणुनियां 'टाईम्स'
कुणी वाचतो तासन् तास!
कोणी ग्रंथ बडा उघडोनी
मुद्रा करतो मग्न चिंतनीं

कुणी चारचौघे जमुनीयां
चघळतात मग शेवगाठिया!
राजकारणाचे अंदाज
बांधुनि कोणी मारी पैज
पगडी काढित टाळूवरुनी–
पहा फिरवितो हात हा कुणी!
मधेंच कोणीतरी अशील–
हळूच डोकाउनी बघेल
दिसे न त्याचा तिथें वकील
मागें घेई तसेंच पाउल!
इतुके असतां वकील तेथ
एक ना जणू त्यास पसंत!

कोर्टाच्या या आवारांत
किती माजलासे गोंगाट
उंच मारवाड्याचा सूर
वकिलां सुनवी गोष्टी चार
मधेंच कोणी डोळे मिचकुनि
कुजबुजतो वकिलाच्या कानीं

वकील बोले हलवुनि माना
"तुम्ही आतां स्वस्थ रहा ना!"
जुनाट पत्रांचीं भिंडोळीं
गिचमिड शब्दांचीं वेटोळीं
'ष्टाम्प', नोटिशी-अन् लिहिणावळ
यांची जमली इथें भुतावळ!
वकिलांच्या नांवें झालेली
ऐकूं येई ही लल्कारी
कारकुनांची चाले धांदल
गरीब अशिलां तोच वकील!
अजाण, नडलेल्या म्हाताऱ्या
अंग चोरुनी येथें बसल्या
कीर्द चोपडी घेऊनि हातीं
पहा चालला हा गुजराथी
तोंडाचें बोळकें करून—
चघळी तंबाखूचें पान
बसल्या जागेवरुनी स्वारी
कोपऱ्यांत मारी पिचकारी!

गवळ्यांचे निरखीत मुखवटे
पठाण फिरती घेउनि सोटे
खेड्यांमधले किती मावळे
व्हरांड्यांत केव्हांचे बसले
वाढे उंच सुरांची लांबी
कोर्ट शिपाई देतो तंबी!

मधूस वाटे 'लोक एवढे
खेळतात कोर्टीतले लढे
एकहि त्यांच्या मधला कोणी
पाही ना मजकडे ढुंकुनी!
वकील निवडक जे जुन्यातले
सगळीं निघती त्यांचींच कुळें!
त्यांची होइल काडीमोड
माझ्या आशेचे ते मोड!
नवीं अशीलें येती तींही—
धरति जुन्या वकिलांची बाही!
आम्हांसम जीं नवथर तट्टें
कुरण चराया उरलें कोठें?'

उरकुनि तेथेंच चहापान
चारपांचचे ठोके ऐकुन
घरीं परततो वकील थकुनी
सक्तीची जणुं शिक्षा भोगुनि!
रोज असें कोर्टाला जावें
कंटाळुन मग घरीं निघावें
दिवस लोटले महिने गेले
अशील नाहीं एक भेटलें!
मनांत म्हणतो वैतागानें
'कसा मार्ग यांतुनी काढणें?
वकिलीच्या नांवानें खोटे
व्यर्थ चालले माझे खेटे
केवळ तिचाच आग्रह म्हणुन-
असें कंठितों रुक्ष जीवन
वकील सांगायास तोंडभर
खराखुरा परि मी बेकार!
वर्षामागुन वर्षें जातिल
असाच राहिन मी कंगाल

इतर चारशें वकील सोडुन
माझ्या दारीं येइल कोण?
भविष्यचित्रें बघुनि कोणतीं
केली होती घोकंपट्टी—
हिंदु-वाटण्या भानगडीच्या
'स्त्री-धन' हातीं जाइ कुणाच्या—
शिकुनी, वकिली चाले काय
पाळण्यांत हे दिसती पाय!
उद्यांपासुनी नको म्हारकी
बसें आपला स्वस्थ घरीं कीं!'
कडवट ही घेऊन टोचणी
घरास येई उदासवाणी
"काय खबर?" ती पुसतां रोज
सांगायाची वाटे लाज
'दुसऱ्या सांगुनि थांबे दुःख
तिला कशी सांगूं परि रुखरुख?
प्रमिला तर अभ्यासीं चूर
नको तिजपुढें ही कुरकूर'

निरुपायानें मुद्रा रडकी
दोन्ही हातांनीं तो झाकी!

तिचीं चालती रोज जाग्रणें
त्याचा डोळा कुठुनि लागणें ?
अभ्यासीं ती असतां दंग
निद्रेचें मग घेउनि सोंग—
तिच्या चेहऱ्यावरचे भाव
चोरुनि बघतो मधुकरराव !
त्याला वाटे, 'खरीच आतां
प्रमिला माझी दिसे देवता !
भक्त पाहतो टक लावोनी
अक्षर नाहीं निघत मुखांतुनि !
प्रकाश पडला तोंडावरती
झळके जणुं देवीची दीप्ती
हातीं पेन दिसे जें लठ्ठ
आयुध तें जणुं धरलें घट्ट !'
पहात राही घटकाघटका
लोभी दृष्टीनेंच सारखा !

कंदिलापुढें बसे ती किती
हंसरी प्रेमळ मूर्ती होती
मनांत म्हणतो 'प्रमिलेपाशीं
असती सामर्थ्याच्या राशी
कष्ट जरी चालले रोजंचे
पहा तेज तोंडावर नाचे !
दुर्दम्य हिचा आशावाद
मुद्रेवर स्फूर्तीचा माद
उत्साहाचा बघुनि उमाळा
चालूंही लागेल पांगळा
मनास छळणारीं धुंगुरटीं
हिच्या दर्शनें पळुनी जाती'
अभिमानाच्या आवेगांत
घट्ट धरी प्रमिलेचा हात
चमकुनि वळुनी प्रमिला पाही
"झोप कां बरें आली नाहीं ?"
मनांतली आठवुनी खंत
ओशाळुन मग सुटला हात !

# त्याची वकिली

मनांतला लपवितां गोंधळ
त्याची कोण उडे तारांबळ
"वाजले किती लक्ष असे का ?
बाराचा बघ पडला ठोका"
कोणत्या दिशे वारा वाहे
प्रमिलेनें जाणिलें सर्व हें
'निश्चित यांच्या मनाभोंवतीं
बसल्या बळकटशा निरगांठी
नाहीं येत मुळीं उलगडतां—
होउनि बसला असेल गुंता !'
"झोप न ये ? कां जागे अजुनी ?"
हळूच पाही प्रश्न टाकुनी !
"कधींतरी सांगेन समजुनी"
उत्तर आलें सुस्कारोनी !
"काय असें ? बोला कीं आतां
अभ्यास असे झाला पुरता"
गोंधळला तो; काय म्हणावें
शब्द एक ना मुळीं आठवे

टाकुनि ती हातांतिल पुस्तक—
हळू थोपटी त्याचें मस्तक
मनांतला कर्कश गोंगाट
क्षणांत वाटे झाला शांत.
हळूहळू मग सुरू जाहलीं
त्याच्या वकिलीचीं रडगाणीं !
सांगुनि टाकी स्पष्ट एकदां
कोर्टामधली सगळी त्रेधा
"कष्ट, चिकाटी, निष्ठा अढळ
करुनि पाहिलें सर्व-निष्फळ !
महिने झाले जरी कितीक
अशील नाहीं वळला एक
माझा आतां खचला धीर
नको जिणें असल लाचार
पैसा कमावण्याची कुवत
कधीं यायची या वकिलींत ?
भलत्या धरल्या मनांत आशा
त्यांचा झाला असा तमाशा !

माझ्यापायीं तुझाही गळा
आतां उरला नाहिं मोकळा"
प्रमिला हंसली, "हेंच एकटें—
कारण दुःखाचें का होतें ?
उगीच कसलें भलतें वेड–
घेऊनि करितां डोकेफोड ?
'तूं' अन् 'मी' हीं कोठुनि असलीं
नातीं झालीं आज वेगळीं ?
वकिली नाहीं जरी चालली
चूल त्यामुळें नाहीं अडली
पहिल्या वर्षभरांत कुणाचा
बसला आहे जम धंद्याचा ?
आज भासती जेवढे बडे
त्यांचीहि अशी दुर्दशा उडे
हातपाय गाळून महाशय
गांठाया चालला हिमालय !
तुम्हांला मी, मजला तुम्ही
पडेल दोघां काय मग कमी ?

थोडे उरले कष्ट आपुले
मीहि एकदां बी. ए. झालें
पत्करीन मग कुठें नोकरी
कमावण्याची भीति कां तरी ?
येतिल दरमहिना चाळीस
कां होतां मग असे उदास ?
पैशाची सोडाच काळजी
पहा सांठविन थोडी पुंजी—
पुढल्या वर्षीं या दिवसांत
खुशाल तुम्ही जा कोर्टांत !"
"प्रमिले तूं पैसे कमवावे
अन् आम्ही कोरडें रहावें !
मिळवायाची गोष्ट राहिली
खर्चीं पडते रोज अधेली !"
"मनांत कां हे असे विचार ?
तुमचा माझा हा संसार
'तूं' 'मी' आतां नाहीं उरलें
जें आहे तें सर्व 'आपलें' !"

ऐकुनि हे धीराचे बोल
शांत जाहला हलकल्लोळ
तिच्या मुखांतिल शब्द एकटा
वाटे चैतन्याचा सांठा
रखरखीत जणुं रेताडांत
मिळे सावलीचें सुख शांत
'प्रमिला नसती मज वाटाडी
थंड जाहली असती नाडी !
सदा मी पडें मागें मागें
हात तिचा आधारा लागे
प्रवास दोघांचाहि; परंतु–
त्यांत असें मी अडेलतट्टू !

मला संकटांचे जे डोंगर
उडवी ती जणुं मारुनि फुंकर
जों जों व्यत्यय निघती मोठे
उत्साहाची सीमा गांठे
तिनें गाळले कधीं न पाय
मीच नेहमीं गोगलगाय !
तिचें घट्ट मी धरलें बोट
कशास नाहीं आतां भीत
ती जर म्हणते कोर्टा जावें
त्यांत खास मग तथ्य असावें!
पुन्हा आज हा निश्चय ठरला
उद्यां जायचें मी कोर्टाला!'

# आघात!

मनांत धरिला नवा हुरूप
दिवस सरकती आपोआप
पूर्वी वाटे तास युगासम
आतां उत्साहाचा मोसम
कोर्टामधलें केविलवाणें
ऐटीनें काढतो मग जिणें!
मनांत म्हणतो 'कष्टाचे क्षण
ही तर श्रेष्ठपणाची खूण'
बेकारीला आली आतां ,
कठिण व्रताची थोर प्रतिष्ठा!
मिळे न अजुनी एकहि दावा
इतरांचा आतां नच हेवा
प्रमिलेच्या सांगण्याप्रमाणें
ठरलें कोर्टांत रोज जाणें

तीहि सारखा अभ्यास करी
त्यावर अवलंबून नोकरी
निकाल कळतां लगेच खेटे
घालायाचे कोठें कोठें
शब्द टाकतां थोडा कोणी
कुठें आपली लागे वर्णी
पुढें करावीं कुठलीं प्यादीं
याची झाली तयार यादी!
मिळेल जेव्हां जेव्हां वेळ
अभ्यासीं घालविते सकळ
मधुकर आतां ठायीं ठायीं
म्हणूं लागला तिजला 'बाई'!
तीहि म्हणे मी 'असें मास्तरिण
बाकावरती उभें करीन!'

तिला न बोलायाला सवड
त्याची चाले कुत्तरओढ!
बसते त्याची जिथें नायिका
तिथेंच हा घुटमळे सारखा
शोधुनि काढी निमित्त फुसकें
तिचें लक्ष जाईल नेमकें—
अशी युक्ति त्यानें योजावी
आणि तिला बोलाया लावी!
बोरें, द्राक्षें घेउनि चार
मिटक्या मारित तिच्यासमोर—
उभे रहावें-सुटुनी पाणी
तिनें करावी मग मनधरणी!
किंवा मधेंच 'हाय' म्हणोनी
बोट धरावें घट्ट चोखुनी
ती येतां धावोनि सत्वरी
बोले 'मुंगी फार चावरी!'
बोट तरी एवढें बहादर
जखम बरी होई न प्रहरभर!

त्याचे असले गनिमी कावे
किती दिवस सारखे पचावे?
तीही बनली मग वस्ताद
फसवणुकीला देइ न दाद
अखेरचा हा प्रयत्न म्हणुनी
नवीन शकल योजतो मनीं
अभ्यासाचें उघडी पुस्तक
तोंच तिला हा म्हणे अचानक—
"हे बघ होतां नोकरी सुरू
स्वयंपाक देणार ना करूं"?
"त्याचें आत्तां काय? ही तुरी—
भटभटणीच्या भांडणापरी!"
"उगाच तेव्हां निघेल तंटा
म्हणुनि सांगतों निक्षुनि आतां
एक वेळ सैपाका लाग—
करीन मग मी अन्नत्याग!"
"वकील आहां ना इरसाल
दोन्ही वेळ यथास्थित खाल!

चला मला वाचूं द्या बाई
नातर 'बाई' घरींच राही!"
लावी सगळें लक्ष पुस्तकीं
वकील मग सुस्कारा टाकी!

असें चाललें होतें सगळें
भविष्यावरी लावुनि डोळे
नसेल दोघांच्या स्वप्नांत
घटना कसली नवी पुढ्यांत
म्हणती 'आपण ठरवूं बेत
ते घडण्याचे उरले फक्त'
त्यांत आणखी नवा अडथळा
निघण्याचा किति संभव विरळा
येथपरीची वाट भयानक
पुढची आतां सोपी सडक
पुढें पडति मग आपोआप
दोघांचीं पावलें झपाझप
महिने संपुनि आतां थोडे
परीक्षेस उरले आठवडे

अभ्यासाशीं लढतां झुंज
वाटत होती तिजला मौज
'होईन कधीं मी नापास'
कल्पना शिवे मुळि न मनास
अभ्यासाचा बाउ न वाटे
उभे राहती कधीं न कांटे
प्रसन्न या वातावरणांत
तोंच जाहला वज्राघात!

मधुकर आला कोर्टामधुनी
दिसली नाहीं प्रमिलाराणी
डोकावुन पाहिलें घरांत
मग्न दिसे ती घरकामांत
"कां हो अभ्यासाला चाट
झालें घोकुनि सगळें पाठ?"
हंसत विचारी; तोंच वाटली
चर्या कोण तिची सुकलेली
कपडे उतरुनि जाई जवळ
"अशी उडाली कां तारांबळ!

परीक्षेपुढं होता नखरा
गळला आतां कोठें तोरा ?"
त्याला कांहीं मिळे न उत्तर
आज भासली ती गंभीर
हळूच टाकुनि एक कटाक्ष
वळवी दुसरीकडेच लक्ष
"काय जाहलें प्रमिले आज
अशी काय दिसशी नाराज
झाला तरि अभ्यास बरा का ?"
"पुस्तकास ना शिवलें एका
असेंच आतां चालायाचें
जें होइल तें पहावयाचें"
ऐकुनि झाला मधुकर थंड
"नवीन काय निघे हें बंड ?
चालविशी तूं काय हें बया
सगळे श्रम जातिल कीं वाया !"
"आजवरी जे श्रम मीं केले
पास तयें झालें तर झालें"

तोंड उघडलें त्यानें; सगळीं—
वाक्यें परि आंतचि विरघळलीं !
'वैराग्याचे कडवट सूर
हिच्या मुखीं लागति वेसूर
हातपाय जर गाळी प्रमिला
कोसळला मग सगळा इमला !
तिच्यासवें धैर्यें झगडोनी
संकटराशी धरल्या अडवुनि
प्रतिकाराचे दगड पोखरुन-
आज अचानक फुटलें धरण !
माझीं शल्यें चालविणारी—
हंसरी देवी आज घाबरी
मी हा असला खिन्न उदास
उगाच सोडी जो निःश्वास
प्रमिलेला खुलवावी, असली-
माझ्यावर यावी ना पाळी ?'
अंगीं आणुन धैर्य केवढें
उभा राहिला मग तिच्यापुढें

"प्रमिले वद तूं आतां स्पष्ट
मळूल तुज बघतां किति कष्ट
कां असला आला वैताग
होरपळे तुज कसली आग ?
धैर्याची मूर्तिमंत पुतळी
शकलें होउनि कां कोसळली ?
पुढचे ठरले किती मनोरथ
जगतों ना त्यावरी तरंगत ?
भावी सौख्याची ही रास
तोच आपला असे प्रकाश
कां मग आजच एकाएकीं–
डोळ्यापुढती ये काळोखी?"
स्वर त्याचा किति कंपित होई·
प्रमिलेच्या परि गांवीं नाहीं!
मधूस वाटे खास आजला
आहे कांहीं रंग वेगळा!
रोजचें कुठें मिस्किल ध्यान
आज गरम हें वातावरण!

प्रमिला बोले तुटकपणानें
जागृत नव्हती जणूं मनानें–
"वाटे गळली आज उमेद
सोडुन द्यावा सगळा नाद
कसली बी. ए. आणि नोकरी
वाफ मुखाची दवडली खरी
मी-मी म्हणुनी ठरवूं जातां
दैव मारतें उलट्या लाथा!
जीवितसूत्रें असतीं सगळीं—
अखेर दैवाच्याच हवालीं"
मधूस पडलें मोठें कोडें
(आडुन हे तर मज ना जोडे ? )
टिपणें अन् पुस्तकांऐवजीं
कां ही सुचली प्रवचनबाजी ?
हळूच म्हणतो जरा चाचरुन
"तत्वज्ञानाचें कां स्मरण ?"
संथपणानें प्रमिला बोले
"सांगूं ? ऐका तर मग सगळें

करा मनाची घट्ट तयारी
दंश भयंकर असे विषारी"
त्याला वाटे विनाकारण—
गेली असेल ती घाबरुन
"तयार आहे बोल लवकरी
असेल फुसकी गोष्ट नातरी!"
प्रमिला फिकटपणानें हसली
"कल्पना तुम्हा नाहीं आली?
मातृत्वाची जबाबदारी
पडली—आतां कुठुन नोकरी?"

किती वेळ तीं बसलीं सुन्न
मना न उरलें कसलें भान
विचारशक्ती झाली सुंद
तोंडांतुन उमटे ना शब्द
परस्परां बघतात समोर
कुणीं कुणाला द्यावा धीर?
तिच्या नोकरीवरि विश्वसली
बिनपैशाची त्याची वकिली!

सर्व चाललें मनाजोगतें
तोंच अचानक बसले गोते
मनोरथांच्या मनिंच्या साऱ्या
आज उडाल्या ठिकऱ्या ठिकऱ्या
अकस्मात हा कुमारसंभव—
त्यानें बसला मुळांत घाव!
प्रमिला बोले, "आतां कुठली
नोकरी मला शाळेमधली
परीक्षा जरी हो हस्तगत
घरींच बसणें आलें प्राप्त
यापुढचें मग वर्ष निदान
नको व्हावया वरती मान
टोंचा कान नि काढा देवी
मर्दुमकी एवढीच भावी!
दुपटीं बदला, घाला न्हाऊ—
म्हणा 'हातरे काऊ काऊ'—
कुंची चढवा, लावा तीट—
यांनीं आतां धरली पाठ!

शेक्सपिअर, इब्सेन आणि शॉ
आजवरी मीं वाचिले कशा?
खरीं पुस्तकें मीं बचायचीं
शिशुसंगोपन शास्त्रावरचीं!
शिकलेल्या बायका मनांत
आंखूं जों लागतात बेत
पाय ओढले जाती मागें
कर्म असें जरि राहतें उभें!
मनांत येणाऱ्या आकांक्षा
दडपुनि खालीं बसतात कशा
सुटे न ओटीचा उंबरठा
कशास मग शिकल्याचा ताठा?
मूल हेंच का ध्येय एकटें
दुजा मार्ग मोकळा न कोठें?
विचार शिकलें किती नवनवे
पुस्तकांतल्या पंडितांसवें
कुणी म्हणे 'ये इकडे नीट
चाल धरोनी माझें बोट
शिकलेल्या 'महिलांच्यासाठीं
अडुनी बसलीं कार्यें मोठीं'
कुणी ओरडे स्त्रियांसमोर,
'तुमच्या हातीं राष्ट्रोद्धार'
स्त्रीकैवारी विचारवंत
असावेत सगळे अविवाहित!
म्हणुनि मांडती स्त्रियांसमोर
समाज, राष्ट्र असें अवडंबर!
कोळुनि प्यालें शिक्षणकाढा
झाला राष्ट्रोद्धार केवढा!
राष्ट्र राहिलें नकाशावरी
प्रसूतिसदनाची ये वारी!
समाजकार्यें जळोत तीं कीं–
मुष्किल साधी मज मास्तरकी!"

प्रमिलेचें जरि बाळंतपण
मधूस वाटे 'माझें मरण!
आता हा संसार वाढता
आवरूं कसा मीच एकटा?

जबाबदारी असे केवढी
बाहेरुनि येईना कवडी!
वकिलीचा तर होता बाजा
भरीस हा पोटशूळ ताजा!
खर्च किती बाळंतपणाला
मनीं आंकडा घोळुं लागला!
'सदनीं' ठेवूं नांव नोंदवुन—
आणावी कीं घरींच सुइण?
सुरू जाहलें हें थैमान
भावी बाप बने बेचैन
प्रमिलेच्या तर डोक्यावरती
कुऱ्हाड ही कोसळली होती
संसार जरी असे मोडका—
सांवरण्याचा यत्न थोडका—
करील; इतुकीहि परि सवलत
मिळण्याचें नव्हतें नशिबांत
'आव्हान असे त्या दुर्दैवा
समोर त्यानें लढा लढावा
दुसऱ्याचीं वैभवें दावुनी
हांस खुशाल आम्हां हिणवोनी
मोकळे जरी असती हात—
सुख निर्मूं आम्ही गरिबींत
कां मग असला गनिमी कावा
दैवानें कपटें योजावा?'
अशा विचारांचें काहूर
प्रमिलेला लावी हुरहूर
दिला आजवर त्याला धीर
प्रमिला आतां खचली पार
दैवाचे निष्ठुर आघात
सोसायाची उरे न ताकद
मनांत बांधी खूणगांठ ही
'मनुजाहातीं नाहीं कांहीं
संसाराची माया फसवी—
हमी कशाची कोणीं द्यावी?
प्रयत्नवादा यश जर नाहीं
नको मनोरथ नवे प्रत्यहीं
यांतुनि निघणें मार्ग शेवटीं
आतां केवळ दैवाहातीं!'

## नवे अंकुर :

पुढचे कांहीं दिवस भयंकर
दोघें बनलीं अबोल फार
पूर्वीची ती विनोद थट्टा
मागमूसही उरला नव्हता
अर्थपूर्ण नजरेनें खिन्न
परस्परांना बघती दुरुन
आधींच मनीं दुःखावेग
त्यांत अबोल्याचा वर डाग
दैवाला इतक्या दिवसांचा
सूड जणूं होताच घ्यायचा !

झाली पास परीक्षा तरिही
आनंदाचें भरतें नाहीं
यश-अपयश या दोहोंवरती
आतां ती अवलंबुन नव्हती
रिकामपणचा झाला चाळा
अर्थ यशाला काय वेगळा ?

वकिली त्याची मुळीं न चाले
आणि लागती तिज डोहाळे !
नांव काय ठेवावें याचा
विचार कुठला सुचावयाचा ?
नांव सुचवितां त्यानें इष्ट
म्हणे ही, "असे मुलगा खाष्ट
ठेवा नांव 'भिकोबा' 'दाजी'
नाहींतर शोभेल 'रावजी'!"
प्रमिलेला माहेरीं न्याया—
नाना आले बोलवावया
'नानांनीं पाळिलें आजवरि
कुठवर द्यावी झीज मीं तरी'
वाटत होता तिज संकोच
कसा सोडवावा हा पेच
"प्रसूतिसदनीं सगळी सोय
कशास घेतां लावुनि हाय ?"

नजरेनें सुचविते मधूला
'टेकू द्या मी म्हणतें त्याला'!
जागा होउन म्हणतो मधुकर
"जबाबदारी सर्व तुम्हांवर–
कशास? केली सर्व व्यवस्था
व्यर्थ कशाला तुम्हांस खस्ता?"
नाना म्हणती, "पहा जांवई
जुनी आपली रीत छान ही
प्रसूतिसदनीं नुसता भपका
पहा आपलें माझें ऐका
घरीं घेउनी जातों आतां
तुम्ही काळजी कशास करतां?"
घेउनि प्रमिलेला गेले ते
जावइबापू घरीं एकटे!

एका दिवसास अकस्मात
आले मग 'रावजी' जगांत!!
निरोप आले किती मधूला
"पहायास या तरी मुलाला"

सासुरवाडी धजे न जाण्या
(काय म्हणावें अशा जांवया!)
नानांनीं मग बळें ओढुनी
नेले–तेथें म्हणती हंसुनी
"जांवईबुवा होते रुसले
अग अग म्हशी म्हणोनी आले!"
नेला अंधेऱ्या खोलींत
कुणीतरी होतें किरकिरत!
दीड वितीची इवली मूर्त–
बाजेवर होती वळवळत!
मांसाचा तो सजीव गोळा
नजर टाकण्या धजे न डोळा
नाना होते समोरच उभे
म्हणती, "आतां लाज न शोभे
नका असे डोळे हे झाकूं
नीट पहा बच्चा-ई-साकू!"
सगळे जमले बाजेभंवती
बाळाच्या न्याहाळत गमती

चिमण्या डोळ्यांमधली लुकलुक
पाहुन करिती सगळे कौतुक
आईबापांकडे बघोनी
म्हणती "काळा हा दोघांहुनि"
कुणी म्हणावें, "पहा हा किती
गेला आहे बापावरती"
कुणास वाटे नकटा थोडा
शोधिति मग नाकाचा शेंडा!
कुणी म्हणावें नीट निरखुनी
"आली आईची ही जिवणी"
जों जों हें कानांवर येई
मधू बावरा होउन जाई
'कौतुक हें सगळें ऐकोनी
वाटत काय असेल तिज मनीं?
धोंड तिच्या मार्गांपुढची ही
रूप मानवी घेउन येई
असले पाहुनि सोपस्कार
होतिल तिज यातना भयंकर
विचार कसले तिच्या मनांत
अन् चाले इतरांची गंमत
म्हणेल मज पाहतां समोर
'आलें मीठ पहा जखमेवर!'
नेत्रांतुनि जर पडल्या ज्वाला
कुठल्या मज त्या सोसायाला?'
प्रमिलेच्या नजरेला नजर
द्यायचा न त्या होई धीर

थोड्या वेळानंतर सगळे
खोलीमधुनी हलूं लागले
मधुकर उचलूं लागे पाउल
चोरटेपणीं बघतो मूल!
तोंच दिसे हाताचा एका—
बाळाभंवती प्रेमळ विळखा!
राहवलें ना; उचलुनि मान
दृष्टि सरकली बाजेवरुन
पाहुनि प्रमिलेचा अवतार
जाई तो गोंधळून पार

विस्तव होता बाजेखालीं
हळद अंगभर ही चोपडली
नांव पोलकें; परि बंडी ही—
मनगटावरी आली बाही !
अंगाखालीं जुनाट कांबळ
डोळ्यांमधुनी चमके काजळ
लुगडें होतें मळकट थोटें
असंख्य त्यावर दिसतात पुटें !
अंगभरी तेलाचे राप
उग्र तयाचा येई दर्प
पायामध्यें चढले मोजे
डोक्यावरुनी पदर विराजे
दुरुनी त्याला भासत होती
भिजलेल्या वाटाण्यासम ती !
जीव मुठींत धरोनी सगळा
भिडवी तो डोळ्याला डोळा
संतापाचा कटाक्ष एक
वाटे 'मजला करील खाक'

घट्ट करोनी धैर्यानें मन
बघे तिजकडे तो ओशाळुन
आश्चर्याचा बसला धक्का
पूर्वीची प्रमिला-हीच का ?
नेत्र तिचे-त्या खरें न वाटे-
आनंदानें चमकत होते !
भेटायाचा जिथें निखारा
वहात होत्या अमृतधारा !
समाधान सुख यांनीं सगळी
दृष्टि तिची होती थबथबली !
किती कल्पना-किती बोलणीं
दोघांनीं घेतलीं समजुनी !
कटाक्ष होता जरी अबोल
ज्ञानकोश त्यामधें मावतिल !
उसळुन आले प्रेमळभाव—
त्यांचा बाळावर वर्षाव

तिला पाहुनी उल्हासांत
मधूस वाटे हलकें, शांत

## तो आणिक ती

मनास उलगडलें ना कोडें
स्थित्यंतर हें घडे केवढें
नुकता अवतरलेला प्राणी—
त्याची तर ना अद्भुत करणी ?
म्हणतो, 'आतां झालों बाप
उभें राहिलें माझें पाप!
हा जो (ज्याला नांव न अजुनी
बाप जयाचा शंख शिरोमणि!
कान जयाचे दिसती लांब
बुद्धीनें पोष्टाचा खांब!)
बाजेवरचा तोच 'रावजी'—
काढील उद्यां अक्कल माझी !'
तोंच अचानक हसूं लोटलें
'नवल पहा केवढें जाहलें
होतों आम्ही दोघे सारे
पहा कोण हें आलें तिसरें !'

तिला स्वतःला आवडणारें
'मोहन' त्याचें नांव ठेविलें

हळूहळू मग जमली होती
त्या दोघांची मोठी दोस्ती!
प्रमिला त्याशीं बोलत राही
अबोल मोहन नुसता पाही
तिचें बोट घेउनि चोखावें—
फक्त एवढें त्याला ठावें!
कधीं तिजकडे लावितांच टक-
समजुनि ही घे अर्थ अनेक
मोहनचे हुंकार ऐकुनी
म्हणे 'सांगतो मज गाऱ्हाणीं'
मधुकर येई अधुनी मधुनी
वाट न पाही डोळे लावुनि
म्हणे, "एकटी नसे तुम्हांविण
सोबत आहे माझा मोहन"
मधू म्हणे "या पोरापुढती
कशी आमुची होईल स्मृति ?
बाप जाहल्यापासुनि सगळी
किंमत माझी खलास झाली!"

मोहन आला आपुल्या घरीं
मधूस आतां कोण विचारी ?
मधुकरची कपड्यांची पेटी
आतां ठरली मोहनसाठीं !
युवराजांच्या सेवेकरतां
थोडी होई भुई धावतां
आक्रंदून रडाया लागे
मधुकर झटतो कराया उगें
वाटीवर वाजवतो चमचा
मधेंच काढी स्वर पक्ष्याचा !
हावभाव करुनियां वाकडे
उगें कराया पाहतो रडें
वकिली ती तसली कोर्टांत
घरांत चाले असली कसरत !

संसाराचीं कामें सगळीं
हळूहळू ती बघूं लागली
सैपाकास तिनें लागावें
त्यानें मुलास सांभाळावें !

मधुकर बनला त्याची दाई
मंडईमधें घेउनि जाई
धोतरामधें नाक निपटणें
हुंकाराला उत्तर देणें
ओलें दुपटें मधें बदलणें
त्याच्यावरती आलें बघणें !

सगळा जरि पूर्वीचा थाट
बदल केवढा मनःस्थितींत
प्रथम तिनें संसार थाटला
सीमा नव्हती उत्साहाला
सुखराशीचें जणुं भांडार
सदैव होतें खुलें समोर
साध्या भांड्याकुंड्यामधुन
आढळलें तिज सौख्याचें धन
आतां सगळें तें पालटलें
विरलीं तीं जादूचीं पटलें
शिजवी जरि भाताचा रट्टा
अमृतगोडी सरली आतां !

## तो आणिक ती

मोहनवर सारखा पहारा
दिवस त्यामधें जाई सारा
आशा, ओढ उरे न स्वतंत्र
बनली ती कळसूत्री यंत्र
"असेंच का हें चालायाचें—
रहाटगाडें चिरकालाचें ?
मोहन निजला; सर्व वेळ हा—
स्वस्थ बसोनी चालला पहा
नवें शिकावें नवें पहावें
ज्ञान नवें कोठुनि ऐकावें
मन वेगानें धावुनि जाय
मुलामुळें परि अडला पाय !
बरोबरीच्या किती मुलींस
शिकण्याची अजुनीही हौस
धीट कुणी व्याख्यानें देती
खेळामधे कुणाची प्रगति
चर्चा, संमेलनें यामुळें
टवटवीत किति राहती मनें

झाले जरि शिक्षणसंस्कार
आळसून मन बसेल कुठवर ?
चाकोरीबाहेर पडाया
धडपड करील-जरि ती वांया
मीहि जरी त्यांतलीच एक
जमीन अस्मानाचा फरक
मन जरि बाहेरच्या जगांत
मी खिळलें परि माजघरांत !
ज्या दिवशीं मी झालें आई
मन माझें गुदमरुनी जाई
हातीं घेणें घुंगुरवाळा
एवढाच उरला मज चाळा
दूध द्यायची झाली वेळ
आतां यासाठींच घड्याळ
पटविण्यास स्वस्त्यामधिं सौदा
डिग्रीचा काय तो फायदा
मन हें झालें जरी सुसंस्कृत
स्मृती तयाची उरली फक्त !

गळ्यांत आहे लहान मूल
बाहेर कसें पडेल पाउल
जीव आंत  हो थोडा थोडा
आतां कायमचा हा खोडा
मूल जरी लाभे सुकुमार
किंमत द्यावी लागे जबर
सर्वस्वी मज करुनी हतबळ
घरांत आला मोहनबाळ!"
मधेंच झोपेमध्यें मोहन
वळवळला आईला बिलगुन
तिच्याकडे पाहून जणुं म्हणे—
'लावतेस कां मला दूषणें ?
मी तर जीव किती असहाय
तुझ्या कुशीवांचुनी न आश्रय
रोखुं नको संतापुनि डोळे
जळेल माझें अंग कोवळें!'
शांत पाहुनी तें मुखमंडल
मातृप्रेमा फुटती पाझर

क्षणामधें तें सुसंस्कृत मन
विसरुनि जाई भूकतहान!
ज्यानें मन मारिलें उपाशीं
कवळुनि त्या धरिलें हृदयाशीं!
तिचें तिला ना उमजे पुरतें
कुठल्या लाटेसवें वाहते!

मोहन झाल्यापासुन एक
दोघांमध्यें झाला फरक
पूर्वीं त्यांच्या संसारांत
ईनमीन तीं दोघें फक्त
दोघें जरि झालीं अस्वस्थ
तिसरा नव्हता कुणि मध्यस्थ
आपआपलें घेउनि दुःख
झुरूं लागती होउनि विन्मुख
छोटा मोहन घरांत येतां
माध्यम जणुं लाभलें उभयतां
प्रेमाचें बोलकें प्रतीक
दोघांना खेचतें नजीक

मोहन दिसतां आपोआप
पळे अबोला अन् संताप
तिच्या मनीं जी रुखरुख, दंश
विषार आतां शिवे न त्यास
अपत्यप्रेमाचा ये पडदा
टळे त्यामुळें ही विषबाधा
संसाराची रुक्ष, कोरडी
सुरू जाहली नवी ही घडी
एक जाउनी दुसरा येई
असेच गेले महिने कांहीं
मधुकर वकिलीच्या धंद्यांत
अजुनी होता तसाच रखडत
प्रमिलेनेंही डोळ्यांपुढलीं
मोठीं ध्येयें पुसुनि टाकलीं
संसारांत तयांच्या आतां
कसल्या उसळत नव्हत्या लाटा
एकवेळ जो प्रवाह होता
बनला स्तब्ध जलाशय आतां

प्रमिलेला वाटते टोचणी
डाव साधला मजवर कोणी
दैवाला जय सहजासहजीं
मिळूं द्यावया नव्हती राजी
कोणापुढती मान तुकविणें
तिला पत्करे याहुनि मरणें
पुन्हापुन्हा मन उठुनी वेगें
हातपाय उचलाया लागे
'संकटराशी सगळ्या ढकलुन
अजून चढुनी जाऊं चढण'
सुप्त मनांतिल आशावाद
करूं लागला सुखसंवाद
'पडतील तसे सोशिन कष्ट
उलटवीन दैवाचा हट्ट'
अटीतटीच्या विचारांतुनी
दिसल्या सामर्थ्याच्या खाणी!
फुंकरला सगळा अंगारा
फुलूं लागला पुन्हा निखारा!

मधुकर येतां घरीं त्याजला
बेत सांगते सगळे प्रमिला
"आज जाउनी मीच शोधतें
नोकरी कुठें मिळते का तें
रजेवरी जाती मास्तरणी
अर्ज धाडतें दहा ठिकाणीं
असे मोकळी कोठें जागा
पाहतें कुठें जुळतो धागा"
मधुकर म्हणतो, "मूल घरांत
कशास पडशी या फंदांत?
मोहन अजुनी लहान पोर
त्याचे हाल कितीतरि होतिल"
"शाळेमध्यें पांच तास मी
बाकी आहेंच कीं रिकामी
दुपारचा बहुतेक वेळ तो
कसा सुखानें शांत झोपतो
उठुनी आईची आठवण—
तों मी येइन कीं शाळेंतुन
विश्वासाची बघुं कुणबीण
तिच्याजवळ मग राहिल मोहन"
प्रमिलेनें ठरविलें एकदां
त्यानें 'नाहीं' म्हटलें न कदा!
शेवटीं म्हणे, "पहा आपलें
नाहीं कळत मला त्यामधलें"

दुसऱ्या दिवशीं त्यानें पहिला
कोर्टाचा कंटाळा केला
प्रमिलेनें निजविलें मुलाला
निघे नोकरीच्या शोधाला
मोहनच्या अंथरुणापाशीं
बाप सज्ज होता सेवेसीं!
बोथी, वाटी, चमचा, दूध—
होतीं उपकरणीं हीं सिद्ध!
जरा कुठें आवाज ऐकतां
मधूस वाटे उठेल आतां
मोहन थोडासा वळवळला
मधूस वाटे, 'प्रसंग आला

पसरुनि आतां हा भोकाड—
बापाची मोडणार खोड!'
पाउल तों वाजलें जिन्यांत
म्हणे 'जाहलों यांतुन मुक्त'
आली प्रमिला शाळा धुंडुनि
पोकळ आश्वासनें घेउनी!
'जरूर पडतां तुम्हांस घेऊं'
सर्वांचे शब्द हे दिखाऊ!
कुणीं म्हणावें, 'अर्ज आपला
टाकुनि ठेवा तुम्ही उद्यांला'
कुणी म्हणे 'पुढच्या वर्षास
सोय लावतों मी हमखास'
अर्ज टाकुनी वाट पहात—
बसे; काय याहुनि हातांत?

तोंच समजलें एके दिवशीं
बोलत असतां सहज कुणाशीं–
पुढच्या महिन्यांत कुणी 'बाई'
कांहीं दिवस रजेवर जाई
गेली तडक तशी शाळेंत
घेई 'बाई'ची मग गांठ

ओळखदेख तयांची नव्हती
प्रमिला सांगे सर्व माहिती
नोकरी करायाची जरुरी
पटवुनि सांगे तिच्या समोरी
म्हणे, "रजेवर तुम्ही जातां
चिकटवुनी द्या मजला आतां!"
भेटे शाळा-अधिकाऱ्यांस
नशीब होतें आज जोरकस
बाईस मिळे रजामंजुरी
(बाळंतपणाची ये वारी!)
जागा जी जाहली रिकामी
प्रमिलेस मिळे ती हंगामी!

तिला नोकरी पत्करण्यांत
वाटे दैवावर ही मात
पक्ष्याचे तुटले–पंख जरि
घेई आकाशांत भरारी
स्मशानांतल्या जणुं राखेवर
सजीवतेचे फुटले अंकुर!

# कशासाठीं ?– बी. टी. साठीं !

'परवांपासुनि या कामाला'
निरोप अवचित घरीं थडकला
होई आनंद जरी मनांतुन
उडली होती पुरती गाळण !
वर्गामध्यें पाउण तास
बडबडणें वाटे वनवास
वर्ग कोणता ? कसले विषय?
विचार येतां गळले पाय !
रजेवरी गेली ज़ी 'बाई'
तिचेंच सगळें वांट्या येई
वीज चमकली जणुं अंगांत–
शिकवायाचें होतें संस्कृत !
'इंटरमध्यें असतांना जें
संस्कृत केलेलें तुटपुंजें
त्यावर दिसली एक न ओळ
संस्कृत सांगूं काय कपाळ !

अधिकाऱ्यांना जाउन सांगूं—
जीव नका वेशीला टांगू ?
कायमची संस्कृतशीं टक्कर
त्याहुनि परवडला संसार !'
'बाई'ला जाउनियां भेटे
म्हणे 'विषय हे बदलुन घेतें'
'बाई'नें सुचविलें हळूच
"सोपविलें ना ? शिकवा तेंच
हवें नको जर कराल आतां
म्हणतिल 'जागा न तुम्हांकरितां'
विषय हवा तो तुम्हांस देतिल
'ठीक-शिकवितें' म्हणा खुशाल"
"ठीक-शिकवितें म्हणुनि कोरडे
कळणार कसे व्याकरण-धडे ?
तुमचें आहे ठीक; तुम्हांला—
कितीक वर्षें ठाउक शाळा

मास्तरकीचा मला न अनुभव
त्यांतुन विषय असा गाळीव!
हजर व्हायचें आहे परवां
करूं कुणाचा आतां धावा?"

'बाई' होती जुनी मुरब्बी
धंद्यामधली सांगते खुबी
"घाबरूं नका; संस्कृत कांहीं
शिकवायाला अवघड नाहीं
घरीं एकदां वाचुनि काढा
संस्कृतच्या नियमांचा पाढा
लागा अभ्यासाला आज
बनाल महिन्यामधिं तरबेज"
"महिन्याचें सांगावें कोणीं?
परवां होइल माझी चटणी!
असतील जरी मुली खमंग
फुटेल मग 'बाई'चें बिंग!"
"थोड्या जरि गांगरून जाल
खास पोरट्या सतावतील!

पहिल्यापासुन वागा कडक
म्हणजे थोडा राहिल धाक
नियम करा पहिला हा बळकट
मुली सर्व अज्ञानी, पोंचट!
'बाई' हीच काय ती ज्ञानी
ज्ञान तिचें काढी ना कोणी
प्रश्न वाकडा दिसतां थोडा
जरा करावा आवाज चढा!
उर्मट दिसली जरा कारटी
चवताळुन जावें तिजवरती
अशी एकदां बसवा छाप
सगळ्या ऐकुनि घेतिल गुपचुप!
पुस्तकांतला दहावा धडा
परवां शिकवा उगाच थोडा!
मधेंच जरि कांहीं न आठवे
शब्द चालवायाला द्यावे!
एक उतारा पाहुनि ठेवा
मधुनी भाषांतरास द्यावा!

जरी न झाली पुढची जुळणी
झालेल्याची करा उजळणी ! ”
शिकवण ही ठेउनियां ध्यानीं
प्रमिला आली घरीं निघोनी
मधूस वाटे आज आपले
उत्सव, सण अवतरले सगळे !
म्हणतो आनंदानें “ प्रमिले,
मनासारखें झालें सगळें ? ”
“ सांगूं वाटे काय नेमकें ?
गरगर फिरतें आहे डोकें !
शिकविणार भाषा गीर्वाण
मास्तरकीचा निकाल पूर्ण !
आणा जाउनि बाजारांत
संस्कृतच्या ग्रंथांचा लॉट !
शब्द चालवुन दाखविलेली
शोधुनि आणा पुस्तकावली !
उघडुनि बसतें धडा दहावा
कसला आहे कुणास ठावा !

मथळा माहित असे धड्याचा—
‘ पित् अपित् अशा क्रियापदांचा ’
तुमचें होतें संस्कृत छान
द्या मजला आतां समजावुन ! ”
मधुकर चढवी लगबग कोट
तेवढ्यांत आठवी संस्कृत !
बघतो डोकावुनी जरासा
म्हणे ती, “ पळा, थांबतां कशा ? ”
गेला मधुकर टाकित टांगा
कंप सुटे मग तिज सर्वांगा !
पाय मोडके शब्द प्रचण्ड
बघती जणुं न्याहाळुन तोण्ड !
द्विखंडचिन्हें आणि प्रत्यय-
कशीं नाचतीं समोर थयथय !
विग्रह, संधी आणि कारिका
साधुनि घेती आतां मोका !
क्रियापदें वाकुल्या दाविती—
‘ पित् अपित् ’ असें गुरगुरती तीं !

पाठीशीं घालुनियां विकरण
उभे राहिले एकएक गण!
शनिवारीं मग दिवसारात्रीं
दोघें संस्कृत घोकत होतीं!
धडा वाचुनी करी तयारी
मधू त्यांतले प्रश्न विचारी
पुरेल तब्बल मिनिटें साठ
घोकुनि इतकें केलें पाठ!
मधू जाहला मग विद्यार्थी
प्रमिला शिकवी त्याच्यापुढती!
तास संपतां पुसे तयाला
"कितपत आतां धडा रंगला?"
मधू म्हणाला, "वाटे ठीक
खपुनी जाइल सगळा झोक!"
"विषय असा हा अगदीं नवखा
नको उराया कसली शंका–
पुन्हां धडा शिकवोनि पहावा
चुका नकों व्हावयास परवां"

बडबड सगळी पुन्हा चालली
त्यानें निमूट ऐकुनि घ्यावी
पुन्हां पुन्हां रंगी तालीम
प्रमिला झाली घामाघूम!

हजर जाहली वेळेवरती
तिची बोबडी वळली पुरती!
दिसतां भंवतीं मुलींचे थवे
चमकति डोळ्यांपुढें काजवे!
कानांवर येतां गोंगाट
पाय कांपती जागीं लटलट!
मनांत म्हणते "मुलींसमोर
शोभा आज खरी होणार
भानगडी या नकोत असल्या
वाटतें करावा सूबाल्या!
'बाई' सांगे ओरडण्यास—
इकडे माझ्या तोंडा फेस!
म्हणे, 'मुलींवर बसवा दहशत'
प्रथम सुटूं दे मला जिवन्त!"

तासाची जों झाली घंटा
हृदया बसला धक्का मोठा!
गेली कशी तरी वर्गावर
शेळी जणुं खाटिकासमोर!

त्याचें त्या दिवशीं कोर्टीत
नव्हतें लागत कशांत चित्त!
घड्याळ बघुनी म्हणे सारखा
'तास संपला असेल तरि का?'
वकिली गुंडाळुनी लवकरी
तसाच आला निघोनी घरीं
प्रमिला दिसली जों दारांत—
म्हणे, 'निघाली काय वरात?
सांग कसा हा धडा जाहला
शब्द एकही ना अडखळला?'
म्हणते ती, "झाला कीं सुंदर
तासभरी झालें भाषांतर!
दिला मुलींना एक उतारा
तास काढला बसुनी सारा!

पित् अपित् जरी होतें ठरलें
पुढच्यासाठीं राखुनि आलें!
तयार आहे दहावा धडा!
त्यावर ढकलिन हा आठवडा!!"
दोघांचीं घांसुनियां डोकीं
सुरू जाहली ही मास्तरकी
वकील होता तो नांवाला
घरबसल्या परि मास्तर बनला!
आधींचे संपुनिया हाल
प्रमिला झाली पुरी बनेल!
महिन्या दो महिन्यांच्या आंत
मास्तरकी भिनली अंगांत
वाटला किती आधीं बाऊ
आतां शिक्षण कामचलाऊ
रोज बडबडे वर्गापुढती
किती दिवस मग वाटेल भीति?
म्हणे, 'समजली ही मास्तरकी
डोळे झांकुनियां शिकवा कीं!'

निबंध, पेपर गठ्ठ्यावारी
पडूं लागले येउनी घरीं
सांभाळुन सगळीं अवधानें
पेपर ते 'भाजून काढणें'
झोपेनें मग इकडे पेंगत
करते मार्कांची खैरात!
लिहिण्याचा पाहुनियां झोक
अदमासानें टाकी मार्क!
तपासलेले घेउनि पेपर
बेरजा लिही वरती मधुकर!
विनोदें म्हणे, "तुझ्या बरोबर
बनलों आहें अर्धा मास्तर!
कोर्टामधल्या खटल्यापेक्षां
सोपी वाटे संस्कृतदीक्षा"!
"बनलां आतां संस्कृतपंडित
डोकें आहे ना वकिलींत?
विचित्र असले तुम्ही वकील
अशीलास संस्कृत शिकवाल!"

त्याचा क्रम रोजचा चालला
कोर्ट गांठतो तो अकराला
ईझीचेअरवरी लोळतां
मनीं घोळती विचार आतां
'दिवस लोटले कितीक असले
खुर्चीतुनि मी कधीं न हालें!
मला नोकरी जरी मिळेल
कटकट ही मागची टळेल
स्वस्थ बसोनी ये कंटाळा
बरी त्याहुनी वाटे शाळा
मास्तरकीचें नसे मला भय
घरीं आयती झाली संवय!
काय करावें? झाली पुरती
माझ्यावर वकिलीची सक्ती
मास्तरकीची कळतां गोष्ट
प्रमिला होइल क्षणांत रुष्ट'
मनीं ठरवितो 'शोध करावा
वशिला तर लावुन ठेवावा

तोंवर तोंडाला ही खीळ
तिला न अक्षरही समजेल !'

एके दिवशीं धीर करोनी
म्हणतो प्रमिलेला घुटमळुनी
"सांगायाचें आहे गुपित
चोरुन केलेला मी बेत
दिवस जाहले इतुके लग्ना
पहिलीच असे ही प्रतारणा !"
त्याचा पाहुनि गोंधळ सगळा
"दिवे कोणते लावुनि आलां ?
काय जाहलें ? कां ही खंत ?
आणणार कीं घरांत सवत ?"
हंसत विचारी; त्याला वाटे
सांगायाचें संकट मोठें
"मजल पोंचली नाहीं इतुकी
धरली आहे मी मास्तरकी !
आधीं कळवायाची भीती
तुझी कधीं मिळणार न संमति
पदरीं पडल्यावरी नोकरी
सांगें आतां तुला नंतरी
रागवूं नको; कोर्टामधली
सोडली न मी अजुनी वकिली
रोज दोन तासांचा नोकर
खराच आहें अर्धा मास्तर
बाकीचा उरलेला वेळ
कोर्टामधिं जाईल वकील !
पगार आहे रुपये तीस
फिटेल मास्तरकीची हौस !"

मधूस वाटे ऐकुनि खास
मनांत झाली ही नाखूष
त्याच्या या कृत्याचे सारे
तिनें जुळविले धागेदोरे
प्रमिलेच्या आग्रहामुळेंच
वकिलीचा पत्करला जाच !
मनांत झाला होता आतुर
जूं झुगारुनी द्याया दूर

ज्याचे हातीं दिसे न पैसा
लळा जडावा त्याशीं कैसा?
'मिळेल कांहीं वर्षानंतर
हात जुळोनी थांबा तोंवर'
रिकामपणचा असला ताण
मनास कुठवर व्हावा सहन?
निष्क्रियतेच्या या व्याधींवर
उपाय म्हणुनी बनला मास्तर!
मनःस्थिती ही केविलवाणी
ती होतीच पुरी समजोनी
भासहि रागाचा ओझरता
चेहऱ्यावरी उठला नव्हता
"स्तब्ध उभी कां? तुजला नकळत
ठरविलें; खरी झाली गफलत"
"चुकलें नाहीं तुमचें कांहीं
कसली गफलत अन् भरपाई?"
घडणार असें आज उद्या ना
माझी होतीच ही कल्पना!"

जावा त्याचा विषाद म्हणुनी
म्हणे विनोदें प्रमिला हसुनी—
"दोघे आतां सम व्यवसायी
तुम्ही काळजी घ्यावी बाई
माझीं बुकें—वह्यांचें बंडल
घेउनि जाल नि पस्तावाल!
पुढची सांगूं आज फजीती?
येतां भेटाया विद्यार्थी—
अशील समजुनि सर्व कायदा
बिचाऱ्यास पाजाल एकदां!
अशील विद्यार्थ्यांचा सगळा
खास कराल तुम्ही घोटाळा!
पुसेन येतां घरीं कुणि नवें—
'वकील-मास्तर-कोण तुज हवें?'"
तिला खरें रुचलें कीं नाहीं
त्यास कळे ना पुरतें कांहीं!

पुन्हां सुखाचें ऊन कोवळें
अंगावरती पडूं लागलें

दोघांमागें होतें काम
(थोडाबहुत खिसाही गरम)
संध्याकाळीं थकुनी यावें
सहवासाचें सुख चाखावें
मोहनच्या पाहुनियां लीला
सीमा कुठली आनंदाला ?
झाला होता तो कमावता
हो 'ध्येया'ची तिच्या पूर्तता
दोघांना जें हवें तें मिळे
जुळलें वाटे सुरेख सगळें
आतां झालीं दोघेंहि स्थिर
उत्कर्षाच्या जणुं शिखरावर

ठीक तयांचें जमे हें खरें
घरांत होतें ना परि तिसरें !
दोघांना ध्येयाची आंच
मोहनला परि त्याचा जाच
कुशींत वाढायाचें हें वय
विरहाची परि करणें संवय !

ल्हान होता अजुनी पोर
आईवांचुनि घरीं दिवसभर
त्यास घरीं टाकुनि जायाचें
दिव्यच होतें तिला रोजचें
खाऊचें दाखवी अमीष
भोळा मोहन त्यावर खूष
शाळेमधि जावयास दिसतां—
मोहन केव्हां रडूं लागतां—
पाउल होई जड रस्त्यांत
वाटे त्यास करावा शांत
तोंच आठवे पहिली घंटा
विवेक घालुनियां मग चित्ता—
टाकुनि मागें मायापाश
लागे शाळेच्या वाटेस
वर्गामध्यें रोज शिकवितां
तिला आठवण होई कितिदां
'किती वाजले ? या वेळेस
स्वारी उठली असेल खास

घंटा झाली ना चाराची ?
ही तर त्याची वेळ दुधाची
पहिलीमधली मुलगी छोटी
अगदीं मोहन इतुकी नकटी !'
विचार सगळे असे शेवटीं–
जाउनि बसती मोहनभंवतीं !
शेवटची ऐकतांच घंटा
गांठी तडक घराचा रस्ता
दिसूं लागतां घर लांबून
म्हणे, 'सुटें एका दिवसांतुन
बसला असेल माझ्यासाठीं
वाटेवरती लावुन दृष्टी'
आई दिसल्यावर रस्त्यांत
पुढें करावे त्यानें हात
दाराच्या उंबरठ्यापासुन
परस्परांना बसती बिलगुन
दिवसभरी ना लाभे आई
त्याची जणुं चाले भरपाई !

आईचा मग पाठपुरावा
मोहननें सारखा करावा
किती वेळ हें चाले रोज
त्या दोघांचें प्रेमळ हितगुज

कधींकधीं तिज वाटे हळहळ
माझ्यापायीं याचे हाल
मोहनची चाले आबाळ
नोकरी असे त्याचें मूळ
गांवामधल्या पोरींसाठीं
तयार उपदेशांचीं पोतीं !
मोहनपाशीं प्रेमळ शब्द
बोलायास मिळे ना फुरसद
नोकरीमुळें चाले नाहक
कर्तव्याची डोळेझांक ?
दूर दिवसभर आईबाबा
त्यावर कुणबीणीचा ताबा
विश्वासू जरि मोलकरीण
आईची सर तिला कुठून ?

आंतड्यांतली कोठें माया
आणि कुठें मोलाच्या बाया
वळण, रीत, घरचे संस्कार
मोहनवर कुठले होणार ?
पुन्हां पुन्हां घोळतो विचार
'चुकलें मी ? कीं हेंच बरोबर ?'

अनेक घेउनि विचारवळणें
ठाम शेवटीं ठरविलें तिनें
'आहे यांत न कसली चूक
मनांतली फसवी रुखरूख
दोनतीन वर्षांच्या आंत
येइल मोहनला समजूत
लागे त्याच्या मागें शाळा
सुटेल आपोआप मग ळळा
पुरीं न अजुनी वर्षें चार—
आई आई करील तोंवर
दुसऱ्यावर अवलंबुनि आज
म्हणुनी ही आईची गरज
उद्यां एकदां फुटतां पाय
निमूट बसुनी राहिल काय ?
मधेंच शाळा सोडुनि आतां
होइल माझी काय अवस्था ?
मोहन मित्रांच्या गर्दींत
'त्यां' ची शाळा किंवा कोर्ट
पुन्हां आपली मीच एकटी
सदासर्वदा दुःखीकष्टी
माझा मजला मग व्यवसाय
सैपाकाविण दुसरा काय ?
ज्या कंटाळुन धरली शाळा
प्रश्न पुन्हां उद्भवेल सगळा
चुकलें कसलें ? सुशिक्षितांना—
हव्याच सोसायास यातना
कांहीं महिने असेंच थोडें
दामटीत हें न्यावें घोडें !'

प्रश्न उभा राहिला समोर
'नोकरी कशी ही टिकणार ?

झाली जरि पोराची आई—
रजा संपतां येइल 'बाई'!
सुटुनी मास्तरकी हंगामी
पुन्हां बसें मी घरीं रिकामी!
कळतां जागेची मग कुणकुण
खरडत बसणें अर्ज नवीन!
बी. टी. मिळती शेंकड्यांवरी
बी. ए. ला मग कोण विचारी?
काय करावें? काय उपाय?
कसा इथें रुतवावा पाय?'

सहज मधूला सांगे सगळे
नोकरींतले हे घोटाळे
मधू म्हणे "या सगळ्यावरती
उपाय एकच आहे हातीं
हव्या कशाला व्यर्थ कटकटी
तूंच होउनी ये ना बी. टी.?"
"बी. टी. म्हणजे काय वाटलें?
मणके होतिल पुरे खिळखिळे"

"पैशाची तुज कसली चिंता
आहें मी आतां-मिळवता!
धरूं नको कसलीही धास्ती
तूं हो स्वस्थ मनानें बी. टी."
प्रमिला काढी संशयशंका
मधू न सोडी तरिही हेका
"गहाण राहिन बाजारांत
कशा तुला त्याची पंचाइत?
तुझी नोकरी असे पुरेशी
प्रवेश होइल चुटकी सरशी
अर्ज आजला टाकुनि ठेव
उगा नको मागुन पस्ताव"
सहज बोलतां ठरला अवचित
प्रमिलेच्या बी. टी. चा बेत

गेला जेव्हां दुसऱ्या दिवशीं
शाळेमधिं तो शिकवायासी
दिसली त्याला बरीच गडबड
बी. टी. च्या अर्जांची झुम्मड

कुणी विचारी त्याला सहज
"कां हो ? करीत नाहीं अर्ज ?
प्रवेश मिळेल; नाहीं नेम
हें सगळें नशिबाचें काम"
त्यालाही वाटलें मनांत
'करुनि बघूं या थोडी गंमत
मीहि धाडतों अर्ज; पाहुं या
तिच्यासवें मिळतें का जाया
असे गाजराची ही पुंगी
काय तयें शेकणार अंगीं ?
समजा नाहीं जमलें कांहीं
इथें कुणाची होती घाई ?
तिला सांगणें नकोच सध्यां–
त्रास कशा द्या उगाच बुध्या ?'
गुपचुप टाकी भरुनी फॉर्म
(चोरटें असें दुसरें कर्म)

नंतर अशाच दिवशीं एका
आश्चर्याचा बसला झटका
उत्तर जें आलें अर्जीस
त्यांत मिळे दोघांस प्रवेश !
प्रमिलेला त्या वेळीं अवचित
कळली मग अंदरकी बात
"केव्हां तें तर कळूं द्या खरें
बी. टी. चें शिरलें हें वारें ?"
मधू म्हणे "मीं केली गंमत
इच्छा नव्हती कधीं मनांत
काय करूं ? ही तुमची बी. टी.
उगाच चिकटे माझ्यापाठीं !
प्रवेश लाभे तरी शेवटीं
जाणें परि आपल्याच हातीं
समजा माझें नाहीं ठरलें
तूंच फक्त जा; काय बिघडलें ?"
उगाच असलें प्रमिलेजवळ
ओढुनियां आणी चंद्रबळ
तिला सर्व हें खरेंच वाटे
म्हणे "तुम्ही तर विचित्र मोठे

प्रवेश मिळण्यासाठीं कितिक
करिती नवस नि यांत्रिक मांत्रिक
झिजविल्याविना जरि उंबरठे
प्रवेश लाभे... नशीब मोठें
मुष्किल तें जर सहजीं झालें
बी. टी. स चला नि व्हा मोकळे!"
मधूस वाटे जरा आणखी
आढेवेढे उरले बाकी!
"समज जाहलों मी जर बी. टी.
मास्तरकी चिकटलीच पुरती
अर्धा मास्तर पुरता होइल
कुठला मग वकिलीला वेळ?"
"मी तर म्हणतें-बी. टी. होउन
वकिली ना द्यायाची सोडुन
प्रवेश लाभे जर सुखासुखी
पदवी मिळवा एक आणखी!
अर्धी मास्तरकी टिकवाया
नकोत कां या सगळ्या पदव्या?

मास्तर-मास्तरणीचा जोडा
कॉलेजीं शोभेल केवढा!
टाकलेंच मीं पक्के ठरवुन
बी. टी. ला दोघांचें मेहुण!"

थट्टेमध्यें जरी ठरविलें
सोपें नव्हतें इतुकें सगळें
नव्या विचारांच्या नादांत
मोहनला विसरे अजिबात
'दोघें जातां कॉलेजांत
मोहन कोणाच्या ताब्यांत?
कोणावर ठेवणें भरवसा
लायक कोण बरें विश्वासा?
जपून तेथें हवें वागणें
बकाल वस्ती-नसे तें पुणें
दिवसा जों बाहेर पडावें
घरीं परततां लागती दिवे
आईबाप घराबाहेर
कुणाजवळ तें राहिल पोर?

मुंबईस जाऊन एकटी
खुशाल झालें असतें बी. टी.
‘ते’ असतांना मोहनजवळ
मला न वाटे इतकी हळहळ
सगळें ठरण्याचा अवकाश
तोंच मिळे ‘त्यांना’हि प्रवेश!’
आधीं केले जे जे बेत
दैवें केली उलथापालथ
काय करावें कसें करावें
मनांत उठलीं असलीं द्वंद्वें
मुद्दे अनुकूल असे कांहीं
देउं लागती तिजला ग्वाही
‘वळून पाहूं नकोस मागें
पुढें पडूं दे पाउल वेगें’
तोंच दाविती दुसरे धाक
‘ठरविलेंस तें सगळें चूक’
भेडसाविती विविध हीं मतें
काय करावें मुळीं न ठरतें

चिडुनी जाई सगळ्यांवरती
‘उगाच पीडा ही मजभवतीं
नशीब आहे असेंच खडतर
जगलें ठेंचा खात आजवर
ठरवुनि कांहीं कुठें कराल
नव कशाला होइल सरळ ?
पदोपदीं खळगे अन् डबकीं
चुकविण्यास येती नउ नाकीं
टळतो जों एकाचा त्रास
तयार तों दुसरा गळफास
संसारमिषें जणूं ठेवला
आम्हां पकडायास सापळा
अजुनी नाहीं पडला फासा
पुढला द्यावा काय भरवसा ?
एकामागुन एक संकट—
सोसायाची कुठवर ताकत ?
आतां पडला सगळा घोळ
कसा घालणें याचा मेळ

'त्यां'नीं बी. टी. सोडुनि द्यावी
संधि आयती ही दवडावी ?
कीं मोहनला इथेंच टाकुनि
जावें-मन हें घट्ट करोनी ?
मुंबई-पुणें घालुनि फेरी
यावें भेटाया रविवारीं
मोहन राहिल या वर्षभरी
नानांजवळी आजोळघरीं'
मनांत येतां अशा कल्पना
किती जाहल्या तिला यातना
'चालविण्या मी माझा हेका
मातृसुखा त्या करीं पारखा
पोर ढकलतें–कां ? तर शिक्षण
आई कसली ? मी कैदाशिण
पोर बिचारें अजुन अजाण
रडतां रडतां जाइल झोपुन
आईमागुन धावुन जावें
मुंबईमधें तिज गांठावें
इतुकें बळ लेकरा कुठून ?
शस्त्र न दुसरें रडण्यावांचुन
रडेल रडेल- आपोआप—
थकुनि शेवटीं बसेल गप्प
हळहळू विसरेल उद्यांला
माझा मोहन या आईला
जातें रोज जरी भेटोनी—
शाळेंतहि येती आठवणी
मोहन जरि दृष्टीसहि न पडे
कसें जायचें वर्ष एवढें ?
अपत्यप्रेमाकडे पाहुनी
सगळें द्यावें का सोडोनी ?'

मायापाश नि नवी उमेद
सुरू जाहलें यांचें युद्ध
विवेकबुद्धी-अपत्यओढा
पुन्हां सुरू झाला हा झगडा
प्रेम आणखी तत्त्वचिकाटी
यांची जणुं लागली कसोटी

या टोकाहुन त्या टोकावर
अशी मनाची चाले फरफर
आणीबाणीची जों वेळ
दृढतर बसे मनाचा पीळ
उसळति वेगानें जों लाटा
तों तों प्रतिकार हो वाढता
हळूहळू बळ एकवटोनी
हल्ला हा हटविला तुफानी
निश्चय केला पुन्हां नव्यानें
ठरलें तें ना कधीं बदलणें

मोहन आहे नानांजवळ
कधीं व्हायची ना आबाळ
आई असतां डोळ्याआड
जास्तच होतिल त्याचे लाड
मुलांत गुंतवितां हा जीव
इथेच थांबे माझी धाव
मोकळीक लाभूं दे थोडी
ही तर जन्मभरीची बेडी ! '

'ऊठ, ऊठ' या ईर्ष्येपुढती
हटली मातृत्वाची महती !!

# बिऱ्हाड मोडलें!

दिवस उगवला आज शेवटीं
मुंबईस तीं दोघें निघती
बिऱ्हाड सगळें इथुनि हाललें
टांगे दारीं उभे राहिले
नाना येती स्टेशनावरी
निरोप द्यायाला वर्षभरी
गर्दी होती आज 'मेल'ला
मुष्किल जागा मिळावयाला
फलाटावरी होते नाना–
हातावर घेऊन मोहना
घड्याळांतले कांटे संथ
पुढेंपुढें ते होते सरकत
शिलकीचे उरलेले हे क्षण
त्यास पहावें डोळे भरुन–
म्हणुनी प्रमिला खिडकीपाशीं
बसुनी टाकी नजर अधाशी

हृदयामधिं आवेग न मावे
वाटतें किती बोलुनि घ्यावें
व्यक्त न होई मनामधें जें
उगा चाळवी त्याचे मोजे
ओघळ निपटायच्या निमित्तें–
तोंडावरुनी हात फिरवते
तिच्याकडे तो घेई झेप
डोळे भरुनी येति अपाप
लटकें आणुनि हसूं मुखावर
थोपविते फुटणारे पाझर
मधें एकदां उतरुनि खालीं
मोहनला प्रेमें कुरवाळी
भेटुनि घेतांना पोटभरी
मायलेक तीं रंगलीं पुरीं
सामानाच्या गडबडींत 'तो'
सगळे नग मोजुनियां बघतो!

मिनिटें हीं चाललीं गळोनी
गडबड वाढे सगळीकडुनी
तोंच आंतुनी ये हाकाटी
"कोणाची ही ट्रंक वळकटी ?"
शिष्ट प्रवासी कुणि शिरजोर
बसला दुसऱ्याच्या जागेवर
जीव गुंतला मोहनपाशीं
केली नाहीं तिनें चौकशी
थोड्या वेळानें जों बघते-
तिच्याच जागेवरती होतें—
कुणी पाठमोरें बसलेलें—
यथेच्छ त्यानें पाय पसरले!
ती म्हणते थोडी रागावुन
"खुशाल देतां कशी तणावुन ?
जागा माझी- आधींपासुन
पहा ठेवलेलें सामान"
संथपणानें वळवुनि मान
बघे तिला तो नीट न्यहाळुन

ओळख त्याची क्षणांत पटली
ओशाळुनि ती किती लाजली
लग्नें हटकून जुळविणार—
होते ते बाबा पेन्शनर!!
उठूं लागतां जागेवरुन
ती म्हणते त्यांना आर्जवुन
"उठतां कां बाबा-काय हें
आपलीच ही जागा आहे
आधीं मीं ओळखलें नाहीं
म्हटलें कोणाची पुंडाई"
बाबा मग बसले खिडकीशीं
म्हणे 'मिळे जागा ही खाशी'
व्यत्यय होतां दूर—पुन्हां ती
करते मोहनशीं गुजगोष्टी
किती वेळ थोडा उरलेला
तोहि मिळे तिजला न मोकळा
बाबा, नाना बोलुं लागले
तिला मान हालविणें आलें!

पाहुनि छोट्याशा मोहनला
बाबांना आनंद वाटला
"टवकारुनि कां बघशी बाबा?
ये-ये-मी तर तुझा आजोबा!
अरे गुलामा–तुझा बापुसऽ–
वेडा भीत असे लग्नास
भिऊन जाऊं नको तूं तरी
शोधुन आणिन मी तुज नवरी!"
विरहकल्पनांचे तिज चटके
कसे सुचावे विनोदघुटके?
मनांत म्हणते "आम्हां आतां
थोडी द्या कीं आज स्वस्थता
उद्यांपासुनी मग आहेच
आम्हांला विरहाचा काच!"
मधूस वाटे इतुकें अवघड
तिच्याकडे बघवेनाही धड
जणूं आपलें लक्षच नाहीं
असें दावुनी करतो घाई

"ये, चल-उरलीं पांचच मिनिटें
राहशील ना मागेंच इथें"
तोंच पाहुनी समोर बाबा
म्हणतो 'आला वृद्ध मुरंबा!
आतां याच्या वटवटीपुढें
प्रवासभर निघती धिंडवडे
सुरू करुनि तोंडाची तोफ
दोघांना हा करील साफ!'
मनांत मोजी लाख जरि शिव्या
मुद्रेवर त्या कशा दिसाव्या?
म्हणे "मिळे आयतीच सोबत
प्रवासांत त्याविण ना गंमत
कुठें निघालां? मुंबईस का?
योग कसा हा जुळे नेमका
पेन्शन घ्यावें बसल्याबसल्या
कशास दगदग खेपा असल्या?"
बाबा हंसुनी म्हणती "नाना,
माझी यांना काय कल्पना?

वय बघतां जरि मी म्हातारा
माझ्याभंवती किती पसारा
छप्पन कामें असती पाठी
मिनिटाची नाहीं विश्रांती"
"बाबा आतां म्हातारपणीं
कशास या कामाच्या गोणी ?
घरीं बसोनी घ्या आराम
म्हणा स्तोत्र अन् सहस्रनाम !
काम कोणतें मुंबईमधें
कीं सट्टयाचे असति वायदे ?"
नाना हंसुनी म्हणती; त्यावर
टाळी देउनि हंसे पेन्शनर !
"काम जरासें आहे नाजुक
त्यासाठीं ही आवकजावक
चुळबुळते जी बसल्याजागीं—
दिसली का गोरीशी मुलगी ?
स्थळ ठाउक मुंबईंत मजला
जातों तिजला दाखवायला !
पहा उद्यांला येतों निश्चित
लग्नाची द्यावयास अक्षत !"
"मुलगी कोण ? नात कीं भाची ?"
"असे पाव्हणी शेजाऱ्याची !
सांगा, स्नेह्यासाठीं एका
झीज सोसणें इष्ट नव्हे का ?"
लपले जरि नयनांमधि आंसूं
प्रमिलेला फुटलेंच परि हसूं !
तोंच वाजली कर्कश शिट्टी
मिळूं लागली मेलला गती
हळूहळू मग डोळ्यांपुढुन–
हटूं लागला मागें मोहन
दैवानें जणुं पंचप्राण
तिचे घेतले हिसकावून
शरीर धावे जरि वेगांत
मन राही मागें फरफटत !
तिला वाटलें माझा कोणी
अवयव कीं घेतला कापुनी

खिडकींतुनि बघते बाहेरी
डोळ्यांपुढती परि अंधारी
तशीच बसली किती वेळ ती
डोकें टेकुनि खिडकीवरती !

जवळजवळ ती सगळी वाट
पेन्शनराची चाले वटवट
बाबांच्या गप्पांचा ऊत
मधू बिचारा होता सोसत
कसे कसे जुळविले विवाह
सांगत होते सगळे अनुभव
किती तरुणतरुणींस आजवर
त्यांनीं नेलें बोहल्यावर
प्रमिला ऐकत होती सारें
वाहुं लागले विचारवारे
'वृद्धांच्या उत्साहामधुनी
होती संसाराच्या जुळणी
माझ्या लग्नाच्या वेळीं तें
असेच खेटे घालत होते
दिली आमुची लावुनि संगत
लक्ष वळे दुसऱ्या लग्नांत
आयुष्याची संध्याकाळ
लग्न जुळविण्यामधिं जाईल
माझ्या जागीं आतां दुसरी
उद्यां उभी राहणार नवरी
शिकलेली ही दिसते थोडी
लग्नाची अडकणार बेडी
तिच्यापुढेंही उद्यां असाच
पडेल माझ्यासम का पेंच ?
तींच संकटें–त्याच आपदा
भेटणार तिजलाहि एकदां ?
या पोरीच्या संसारांत
अशीच होउन बसेल गल्लत ?
घरीं जराशी पैशाची नड
संसाराची सदाच परवड
अन्न पुरेसें असुनी चित्तीं
सदा असावें दुःखीकष्टी

काय करावें नकळे स्पष्ट
नसावें कधीं परि संतुष्ट
कुठेंतरी होते जरि चूक
न ये ठेवतां बोट अचूक
धडपड करुनी वैतागानें
तशीच जाणें तुडवित रानें
सुचेल जें ठेपल्या प्रसंगा
भार ठेवणें त्यावर अवघा

आज संकटें निघुनी जाती
चला उद्यांचें पाहूं पुढंती
असा नेहमीं तळहातावर–
उभा राहिला हा संसार
या कुमारिकेच्या नशिबांत
असे हीच का वाताहात?'

शून्य दृष्टिनें भंवती पाही
म्हणे जणूं "न्या मज कोठेंही"

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांतर
अनुक्रम ....५३४५४.... दि: ...
... १०१ ... दि: २-६-१२-५१

# निरोप

प्रिय वाचकहो, तो आणिक ती
उभीं न आतां डोळ्यांपुढती
गेलीं तीं जर दुसऱ्या गांवा
आपण त्यांना निरोप द्यावा
मोहनला ठेवुनियां दूर
आतां बनले खरे मुशाफिर
आपण धावुनि त्यांच्यामागें
कुठवर त्यांचा पत्ता लागे ?
एकत्र जरी होती बी. टी.
होई नकळे काय शेवटीं
काय असावी भविष्यवाणी
नेम काय सांगावा कोणीं ?
जें हातांत दिसे या वेळीं
सत्ता त्यावरतीच आपली
उद्यां व्हायचें आहे काय
त्यावर त्यांचा नसे उपाय
अशीच दिवसा-दिवसावरती
जिणें कंठिती 'तो' आणिक 'ती'

जरी जीव हे अवघे तीन
कोण तयांची ओढाताण !
'पुरुष एकटा शिके एकदां
दहाजणांचा तो पोशिंदा
लाभे जोडीदार सुशिक्षित
खुलुनि दिसावी जास्तच रंगत'
असें काढलें जर अनुमान
काय त्यांत चुकलें मग कोण ?
पहा आमुचीं 'तो' आणिक 'ती'
अनुमानें होतील पालथीं !
कुठली आशा शिकतां होती
हातीं परि राखेची चिमटी !
कष्ट करोनी मीठभाकरी
मिळेल याची नसे खातरी

कां व्हावें असलें उरफाटें ?
उत्तर त्याचें दिसे न कोठें
गरिबीची मोठीशी खंत
त्यांना नव्हती कधींच वाटत
मनासारखें मिळेल काम
आणि पुरेसा जर आराम
दोघांचा छोटा संसार
होते खूषहि ते इतुक्यावर
उगाच आळसलेल्या हातीं
लाभावें सुख फुकटाफुकटी
इच्छा नव्हती असली त्याची
असे तयारी श्रम करण्याची
इच्छा नुसती असुनी काय ?
स्थिर कोठेंही ठरे न पाय
पाठ जाहला सर्व कायदा
सुरू करी वकिलीचा धंदा
जें शिकलों त्यावरती पोट
चुकला कोठें यांत सुशिक्षित ?

नाहीं चूक जरी कोणाची
रग जिरुनी जाई कायमची
शिक्षण घेतांना तो ठरवी
'जमल्यावरती घडी ही नवी—
वेळ काढुनी मग धंद्यांतुन
हाताळिन स्वाभाविक प्रश्न !'
दुसऱ्याचीं दैन्यें, गाऱ्हाणीं
दिसलीं त्याला जीं बालपणीं
झटुनी करुं थोडा परिहार
अशी मनीषा होती फार
तीं दैन्यें, सामाजिक प्रश्न
वाटे आतां जणुं तें स्वप्न !
शिक्षण कोठें येइ न कामा
त्याचा सगळा वेळ रिकामा
रिकामपणची अशी टोचणी
काय करी ती दुजाकारणी ?
बुद्धि असे परि तिला न वाव
मिळे न कोठेंही शिरकाव

वापर कोठें दिसे न डोळ्यां—
शक्ति अशी विरघळते वाया
डंख मारुनी घेत स्वतःस
उत्साहाचा होई ऱ्हास
टाकाऊ ठरला तो आज
त्याच्यावरती चढला गंज

त्याचीं स्वप्नें विरलीं पुरतीं
तिची अवस्था तशीच होती
असती ती जर पुरती 'हिंदू'
'एकच प्याल्या' मधली सिंधू
पतिदेवामागें फरफटुनी
गेली असती मग उद्धरुनी
भलें बुरें कसलें जरि असलें
समाधान असतेंच मिळालें
होती कॉलेजीं शिकलेली
पंचाइत त्यामुळें जहाली
संसाराची हवीच गोडी
ध्येयाची न खपे नासाडी
ध्येय कोणतें नका विचारूं
म्हणेल "आम्ही हवें तें करूं
घरांतुनी सुटल्यावर पाउल
आपोआप समोर दिसेल
ध्येयाचें वर लावुनि लेबल
बाजारीं कुठलें मिळणार ?
डोळे उघडे ठेउन फिरती
त्यांना ध्येयें कितीक दिसती
आम्हांमागें सासुरवास
त्यानें होतो सगळा नाश
विवाह आहे रम्य नि मोहक
त्यावर काव्यें स्फुरति कितीक
मान्य सर्व ही रम्यता जरी
मधुनी येते पुरी शिसारी
विवाह देतो प्रेमळ संगत
गुतती परि कायमचे हात
पुरुष कसे राहती मोकळे
गुंतुन बसती आमचे गळे

थाटे हें जें 'घर', 'संसार'
पुरुषास नसे त्याची घरघर
राहते जिथें व्यवस्थित निगा
स्वस्थ विसाव्याची जी जागा
'घर' म्हणजे एवढाच अर्थ
समजण्यांत भरला पुरुषार्थ
ज्ञानार्जन, बुद्धीचे कष्ट
आणि कलेची कसबी हिकमत
मनशक्तींचा मुक्त वापर
तर्काची पाजळणें धार
सुशिक्षित मनाचे हे लाड
स्त्रियांस कुठले ? नशीब खरतड
लग्नशृंखला पडतांच गळां
या सगळ्यावर फिरतो बोळा !
अंगावर सगळा संसार
भरीस पोरांचें लेंढार
शिकलें कितिही तरी शेवटीं
चूलमूल कायमचीं पाठी
मायावी संसार अचानक
स्त्री-मन जाळुनि करतो राख !"

अशीं आमचीं 'तो' आणिक 'ती'
आंत सारखीं धुमसत होतीं
तक्रारींचें उगाच खापर
नव्हतें फोडित कुणी कुणावर
परस्परांवर होतें प्रेम
आधार तसा विश्वासहि ठाम
सहवासाची रोज माधुरी
किती चाखली तरिही अपुरी
घरीं राहती बसोनी जरी
महाग नव्हती मीठभाकरी
इतुकें असुनी संसारांत
चव थोडीशी होती कडवट
'माझ्यापुरतें बघतां हाल
समाज कुठचा मग पेलेल ?
पुढें ठेवलें ध्येय नि तत्त्व
आतां त्याचें काय महत्त्व ?

## तो आणिक ती

खिळखिळलीं ही सगळीं हाडें
समाजओझें त्यां न परवडे
अशींच खुरडत जाऊं दोघें
संसाराच्या खडतर मार्गें
आम्हांपुरतें मिळे जरी सुख
समजूं कष्टां आलें पीक'
वाटे दोघांनाही कीं या
जगांत आपण गेलों वाया!

वास्तवीक दोघे शिकलेले
आधार खरे समाजांतले
सुशिक्षितांच्या सामर्थ्यावर
सर्व पिढीची किती मदार!
अज्ञांच्या आशेचा ठेवा
आपद्‌ग्रस्तांचाहि विसावा
"शिकलेलीं हीं बहीण भाऊ
यांच्यामागुन खुशाल जाऊं
यांच्या सहवासांत रहा रे
शिकवितील मग चार अक्षरें
बोलतील हीं जें जें ज्ञान
घेऊं सगळें आपण समजुन
मिळतां यांचें सत्पथदर्शन
होइल सगळ्यांचें कल्याण"
असा भाव ठेउनियां निश्चित
बसले सगळे वाट पहात

'तो' अन् 'ती'च्या कानावरती
असल्या हाका कुठुनी जाती?
ते बसले आपल्या घरांत
मनामधें कायमचें झुरत!
समाजांतले बुद्धिमान जे
उसळे रक्त जयांचें ताजें—
शक्य जयांच्या सामर्थ्यास
नवीन रचणें हा इतिहास—
कालशिलेवर अक्षय रेषा
हे उमटवतिल अशी अपेक्षा—
मंगल, पवित्र, समाजांतलें
आश्रयार्थ ज्यांच्या आलेलें—

रोपें उपटायचीं विषारी
ज्यांच्यावरती जबाबदारी—
सतेज, निर्भय विचारबोल
यांचे व्हावे जे रखवाल—
ज्यांच्या दीप्तीमुळेंच सगळी
उंच दिसावी राष्ट्रपातळी—
ते बसले आपल्या घरांत
मनामधें कायमचे झुरत!!

दृश्य विदारक किती भकास
कुणाकडे परि त्याचा दोष?
बळकट हे घेउनियां वेत
कोण वळेल तयां एकत्र?

पांगुनि फुटणारी ही शक्ती
ओतिल एका बिंदूभंवती?
विचारसामर्थ्याचे हे थर
रचुनी भक्कमशा पायावर-
कोण रचे उत्तुंग इमारत
भिडेल जी जाउनि गगनांत?
बुद्धीचे हे जिवंत निर्झर
बांध आडवे पडले त्यावर
वेगवेगळीं झालीं डबकीं
गाळ तळाशीं किती पहा कीं!
कोणी यांतुन कोंडी फोडुन-
ओतिल का त्यांच्यामधिं प्राण?

केवळ या आशेवर जगती
आज सुशिक्षित 'तो' आणिक 'ती'

ग्रंथ संग्रहालय ठाणे
वा. क्र. ६७९९

REFBK-0006199

REFBK-0006199

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
क्रमांक ७३६०५४ वि. काव्य